मंगळवार, २५ एप्रिल २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२३०
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • TUESDAY 25 APRIL 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-230 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

# भाजपाला हीरो ते झीरो करायचे आहे

## ममता बॅनर्जी : विरोधी पक्षांमधील एकतेचा संदेश देण्यासाठी बिहारमध्ये बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : देशात २०२४ साली होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठी विरोधी पक्षांच्या एकजुटीचा प्रयत्न सुरू आहे. त्याच पार्श्वभूमीवर बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची आज ( २४ एप्रिल ) भेट घेतली. 'भाजपाला हिरो ते झिरो करायचे आहे,' असा हल्लाबोल ममता बॅनर्जी यांनी बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना केला.**

ममता बॅनर्जी म्हणाल्या, जयप्रकाश यांनी बिहारमधून आपल्या आंदोलनाला सुरूवात केली होती. त्यामुळे विरोधी पक्षांमधील एकतेचा संदेश देण्यासाठी बिहारमध्ये एक बैठक झाली पाहिजे. याबाबत नितीश कुमार यांच्याशी चर्चा झाली आहे. आमचा उद्देश भाजपाचा पराभव करणे आहे. माध्यमे, गुंडगिरीच्या माध्यमातून भाजपा हिरो बनला आहे, अशी टीका बॅनर्जींनी केली आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी सांगितले, आगामी लोकसभा निवडणुकीपूर्वी विरोधी पक्षांना एकत्र आणण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. देशहितासाठी आम्ही एकत्र येत आहोत. आताच्या सरकारला विकास करायचा नाही. ते फक्त स्वतःच्या प्रसिद्धीसाठी काम करत आहेत, असे नितीश कुमार म्हणाले. यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, तेलंगणाचे मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव आणि तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी विरोधी पक्षांना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न केले होते. आता नितीश कुमार यांनी विरोधकांना एकत्र आणण्यासाठी पुढाकार घेतल्याचे दिसत आहे. अलीकडेच नितीश कुमार यांनी समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव आणि ममता बॅनर्जी यांची भेट घेतली होती.



# पाण्यातील मेट्रो



पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी केरळमध्ये देशातल्या पहिल्या पाण्यातील मेट्रोचे उद्घाटन करणार आहेत. ही मेट्रो इतर मेट्रोपेक्षा फार वेगळी आहे. ही मेट्रो ट्रॅकवर नाही तर पाण्यावर धावणार आहे. याचे उद्घाटन केरळमधील कोचीमध्ये होईल. बंदरगाह शहरात 1,136 कोटी रुपये खर्च करून ही मेट्रो तयार करण्यात आली आहे. केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनी या मेट्रोला राज्याचे 'ड्रिम प्रोजेक्ट' म्हटले आहे.

# खुलताबाद तालुक्यात पाणीटंचाईचे चटके

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद:** तालुक्यात एप्रिल महिन्यात चार गावांना पाणीटंचाईचे चटके जाणवायला सुरूवात झाली असून या गावांना विहिर अधिग्रहण करून पाणीपुरवठा करण्याचे प्रस्ताव खुलताबाद पंचायत समितीने तहसील कार्यालयात दाखल केले आहे. गेल्या दोन वर्षांपासून तालुक्यात जेरदार पाऊस झाल्याने पाणीटंचाई जाणवलीच नाही मात्र यंदाच्या वर्षीही खुलताबाद तालुक्यातील तलाव डबडबली असली तरी तालुक्यातील झरी, वडगाव, धामणगाव, धामणगाव तांडा या गावांना पाणीटंचाईच्या झळा जाणवू लागल्याने येथील ग्रामपंचायतीने विहिर अधिग्रहण करून पाणीपुरवठा करण्याचे पत्र खुलताबाद पंचायत समिती कार्यालयास दिले आहे. पंचायत समिती कार्यालयाने सुध्दा सदरील चार गावांना विहिर अधिग्रहण करून पाणीपुरवठा करण्याचे प्रस्ताव दहा दिवसापूर्वीच खुलताबाद तहसील कार्यालयास सादर केलेले आहे.  खुलताबाद पंचायत समिती कार्यालयाने आगामी काळात संभाव्य पाणीटंचाईचा आराखडा ग्रामपंचायतीकडून मागविला असून संभाव्य पाणीटंचाई बाबत उपाययोजना केली जाणार असल्याची माहिती गटविकास अधिकारी प्रविण सुरडकर यांनी दिली.

**यंदा टँकरची मागणी नाही** : खुलताबाद तालुक्यात दोन वर्षापुर्वी अनेक गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होता परंतू गेल्या दोनवर्षापासून जोरदार पाऊस झाल्याने टँकरची मागणीच नाही या ही वर्षी तालुक्यातील कुठल्याही गावात पाणीटंचाई नसल्याचे पाणीटंचाई विभागाचे सुर्यवंशी यांनी सांगितले .

**तालुक्यातील धरणात मुबलक पाणी** : खुलताबाद तालुक्याकील येसगाव येथील गिरिजा मध्यम प्रकल्प, निरगुडी प्रकल्प, सोबलगाव, टाकळी राजेराय, गंधेश्वर व लोणी लधू प्रकल्पात आजही मुबलक पाणीसाठा असल्याने पाणीटंचाई जाणवत नसल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे .

# या संस्थेत विद्यार्थ्याला ना 'फी' ना शिक्षकाला 'वेतन'


## वारकऱ्यांना मोफत शिक्षण : आजपर्यंत घडवले हजारो 'कीर्तनकार'

आधुनिक केसरी न्यूज

दादासाहेब घोडके

पैठण : आधुनिक काळात एक अलौकिक अध्यात्मिक शिक्षण देणारी श्री संत एकनाथ महाराज प्रा.वारकरी शिक्षण संस्था आज नावरुपाला आली आहे. पैठण  नगरीमध्ये संत एकनाथ महाराज समाधी बरोबरच आधुनिक काळात प्रकर्षाने जाणवणारं एक सांप्रदायिक वैशिष्ट्य म्हणजे वारकऱ्यांना मोफत शिक्षण देणारी ही संस्था गेल्या कित्येक दशकापासून ज्ञानदानाचे व नैतिक शिक्षणाचं अखंडपणे ह.भ.प.अ रखमाजी महाराज नवले यांनी पैठणच्या संत भूमीत उभी केली असून ईथे ना शिक्षकाना पगार, ना विद्यार्थ्यांना फिस म्हणून या संस्थेतून हजारो किर्तनकार आज घडले आहेत. आज असाच आगळा वेगळा निरोप समारंभ या वारकरी संस्थेत पाहायला मिळाला चार वर्षाचा आखीव रेखीव अभ्यासक्रम ज्यात भगवद्गीता, विचारसागर, ज्ञानेश्वरी, पंचदशी, गाथा, ज्ञानेश्वरीतील निवडक अध्याय पाठांतराला व संस्थेची भजनी मालिका पाठांतराला असते. अशाप्रकारे शास्त्र शुद्ध पद्धतीने अध्ययन व अध्यापन केले जाऊन समाजाचे बाह्यांग बदललं तरी त्याची नैतिकता आणी धार्मिक शिक्षणाचा पाया असणारं अंतरंग मात्र बदलू नये यासाठी ही संस्था प्रर्यत्नशील आहे. कोणत्याही सरकारी अनुदानाशिवाय केवळ लोकाश्रयावर कार्यरत असणारी ही अलौकिक कार्य करणारी अशी संस्था आहे. आज समाजामध्ये पैशाशिवाय कोणतेही काम पुर्णत्वाला जात नाही पण याही आधुनिक काळात ह.भ.प. रखमाजी महाराज नवले यांच्या  निष्काम सेवेतून अविरतपणे कार्य म्हणजे  वेतानाशिवाय शिक्षक आणी फी शिवाय विद्यार्थी म्हणजे आधुनिक काळातली एक नाविण्यपुर्णताच म्हणावी लागेल. संस्थेतील समस्त गुरुजन वर्ग विश्वंभर नवले, ऋषीकेश नवले हे हि बाल वारकर्यांना सांप्रदायिक शिक्षण देत असून या वर्षी संत एकनाथ महाराज प्रासादिक  वारकरी शिक्षण संस्थेतून चार वर्षाचा अभ्यासक्रम पुर्ण करून कीर्तनकार म्हणून अंगद महाराज चव्हाण, महेश महाराज गावडे, नवनाथ महाराज गाडेकर, हनुमान महाराज यादव, पंकज महाराज डकले यांनी निरोप घेतला. यावेळी पोलीस अधिकारी कातकडे, चंद्रकांत अंबिलवादे व संस्थेतील विद्यार्थी उपस्थित होते.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## आणिक स्मृती ठेवुनी जाती...

आधुनिक केसरी

तो आपल्या घरातील एक सदस्यच वाटायचा. तो घरी आला की मुलामुलींची आस्थेने चौकशी करणार, त्यांना हक्काने काही मार्गदर्शन करणार आणि लागली तर मदतही करणार असं त्याचं वागणं असायचं. त्यामुळे तो सर्वांनाच प्रिय होता. आम्हा सगळ्यांचा तो ' फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड ' होता. तो उत्तम लिहायचा आणि बोलायचाही छान. एखाद्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदक, कवी आणि लेखक प्रवीण दवणे यांची आठवण यावी असे रसाळ निवेदन तो करायचा. श्रोत्यांना आपलेसे करून करून घ्यायचा. त्याने अनेक सुंदर कविता लिहिल्या, लेख लिहिले. शाळेच्या नियतकालिकाचे आणि इतरही अनेक ग्रंथांचे संपादन केले. विज्ञान कथा तर तो उत्तमच लिहायचा. त्याच्या विज्ञान कथांना मराठी विज्ञान परिषदेचा पुरस्कार मिळाला. ' उर्वशीचे रहस्य ' हे त्याचे विज्ञान कथांवर आधारित पुस्तक लोकांना खूप आवडले. असा हा हरहुन्नरी माणूस. सदैव हसतमुख राहणारा, काव्य, शास्त्र, विनोदात रमणारा. राजकपूरच्या ' मेरा नाम जोकर ' चित्रपटातला नायक हृदयात अनेक दुःखे साठवून लोकांना हसवण्याचे, आनंद देण्याचे काम करत असतो. इतरांना आनंदी करणारी माणसे म्हणजे परमेश्वराचीच रूपे असतात. तसाच हा ! आपल्या हृदयातील व्यथा, वेदना त्याने कधीच आपल्या चेहऱ्यावर दिसू दिल्या नाहीत. आपल्या परिस्थितीचे रडगाणे गाणारे अनेक असतात. पण हा माणूस त्या परिस्थितीलाच साधन बनवून आपले ध्येय साध्य करणारा निघाला. सकाळी पाचला उठून नियमितपणे योग, प्राणायाम करून त्याने आपल्या शारीरिक व्याधींवर बऱ्यापैकी मात करण्याचा प्रयत्न केला आणि त्यात तो मोठ्या प्रमाणात यशस्वीही झाला. रश्मी आणि अभिषेक ही त्यांची मुले. दोघेही आज्ञाधारक आणि सुसंस्कारित. त्याची पत्नी म्हणजे आमच्या वहिनी आदराने आणि प्रेमाने सर्वांचे आदरातिथ्य करणाऱ्या. दादाच्या नाजूक तब्येतीची सदैव काळजी घेणाऱ्या. आपल्या मुलांसाठी त्याने फार काही संपत्ती मागे ठेवली नाही पण संस्काराचे धन मात्र अपार ठेवले. मध्यंतरी अचानक बिघडलेल्या ऊन पावसाच्या वातावरणाने त्याची प्रकृतीही अचानक बिघडली. साथीला असलेल्या दम्याने उचल खाल्ली. हॉस्पिटलमध्ये दाखल व्हावे लागले. आम्ही भेटायला गेलो, तेव्हा तो अतिदक्षता विभागात दाखल होता. चेहऱ्यावर मास्क लावलेला होता. ऑक्सिजन सुरु होता. पण त्याही परिस्थितीत आम्हाला पाहिल्यावर **क्रमशः**





## आनंदी पहाट

### स्वमग्नता स्वप्नांना भग्नावस्थेत आणते

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

रात्र, रात्रीचा दिवस करून दैनंदिन गरजांची पूर्तता करण्यासाठी धडपडत असतो. सद्यःस्थितीत आपल्या मुलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी सर्वप्रथम अर्थार्जन अनिवार्य झाले आहे. तसे बघितले तर अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या तीनही मुलभूत गरजांची पूर्तता शरीरासाठीच होत असते. पण मनाचे काय? ते दिसत नसले तरीही असतेच. आपल्या जगण्यापलीकडच्या जीवनाला मनामुळे आपले आयुष्य वेगळे असल्याची प्रचीती येत असते. अनेकांकडून केवळ शरीरासाठीच सर्वकाही केले जात असते. परंतू आपल्या मनाचा, मनातल्या मनात, मनमुरादपणे किंवा मनमारून, मनपसंद असा कधी विचार खरेच होतो का? निदान तसे अनेकांच्या बाबतीत दिसत तरी नाही. मनंच आपल्याला जगायला शिकवत असते, मनंच आपल्याला पदोपदी अनेकविध निरनिराळ्या प्रसंगांची अनुभूती देत असते. दुसऱ्याच्याच काय पण आपल्या स्वतःच्या मनाचा सुद्धा थांग पत्ता लागणे मुश्कील असते. आपल्या शरीरावर ताबा ठेवून त्याला आपण स्थिर करू शकतो, पण मनावर नियंत्रण ठेवणे मोठे कठीण काम असते. हे आपल्यापैकी प्रत्येकजण सतत अनुभवत असेल आणि म्हणूनच मान्यही करेल. काहीजणांमध्ये स्वमग्नतेचे प्रमाण अलीकडच्या काळांत अधिक दिसून येत आहे. ह्याचा निश्चितच थेट संबंध आपल्या अंतर्मनाशी असतो. मनाचा विचार न करता केवळ कोणत्यातरी अनावश्यक बाबींचा अनावधानाने विचार करणे ह्यामध्ये सुरु होत असते. काही प्रमाणांत अशी व्यक्ती आत्मकेंद्रित झाल्याचा आपल्याला प्रत्यय येऊ लागतो. अशा व्यक्तींच्या अंतर्मनांत सुरु असलेल्या वैचारिक प्रक्रियेत अनाठायी विचारांचा कल्लोळ माजलेला असतो. त्यांच्या शरीर आणि मन ह्याचा मिलाफ होणे शक्य होत नाही. मनातील विचार आणि शरीराचे वर्तन ह्यांचा परस्परांशी संबंध राहिलेला नसतो.



आधुनिक केसरी

**मुक्तीचे साधन | तुका सांगे ||**

हरिनामावीन | नाही रे उध्दार ||
सत्कर्म हे सारं | जीवनाचे ||१||
वासनेचा संग | नको करू मना ||
नरक यातना | भोगीशील ||२||
ठेवावे अखंड | स्वधर्माचे भान ||
तेणे पंचप्राण | मुक्त होती ||३||
लाभला हा जन्म | सत्कार्यी घालावा ||
लडीवाळ व्हावा | ज्ञानाईचा ||४||
सुखाचे संसारी | नामाचे चिंतन ||
मुक्तीचे साधन | तुका सांगे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

निजकारुण्यछत्रं
तेधृत्वा रक्ष्यं जगत्त्वया ।
विपुलकेशसंभारेपाहि
जगत्त्वयाऽधुना ।।४।।

तू आपले कारुण्यछत्र धरून जगाचे रक्षण करावेस. हे विपुल केशसंभार असणारे, तू आता जगाचे रक्षण कर.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

पूज्य कर्म गुण होत है, उमर जाति नहिं कोय ।
जीवन ढर अध्यात्म में, हा हॅंसदशा मय
सोय ।।०२।। (स्वर्वेद द्वितीय मण्डल सप्तम अध्याय) ०२/०७/०२

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

कर्म, गुण, स्वभावाने श्रेष्ठ असणारी व्यक्तीच पूज्य आणि महान असते; वयाने किंवा जन्माने नव्हे. ज्याचे जीवन अध्यात्म क्षेत्रात विकसित आहे, तोच शुद्ध हंस सर्वपूज्य आणि आदरणीय आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## देवदर्शन

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आपण सगळे कळसुत्री बाहुले आहोत विश्वाचं नियंत्रण करणारा एकच आहे आणि त्याच्यच सल्यानुसार हे विश्व अखंड अव्याहत पणे चालले आहे चालत रहाणार आहे. वायूपासून अग्नी निर्माण झाला. अग्नीपासून पाणी निर्माण झाले ज्याच्या सत्तेने विलक्षण घटना घडली तो देव होय. पाण्यापासून प्रुथ्वी निर्माण झाली( आपण शाळेत असताना शिकलो आहोत की पहिला सजीव पाण्यात निर्माण झाला.( अमीबा )असं नाव ठेवले. आणि सर्वात आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे ही प्रुथ्वी कुठल्याही खांबाच्या आधाराशिवाय उभी रहाते आणि हे नवल घडवतो तो देव होय. कार्य व कारण या घटना द्रुष्य पंचभौतिक विश्वतील आहेत.त्याच्याही पलीकडे असणाऱ्या निर्गुण स्वरूपाकडे कार्य कार्यकाल आहे नाही असे नाही पण तिथपर्यंत आपण समजून घेत नाही. संपूर्ण जग ज्याने निर्माण केले त्याचा कार्यकारणाचा संबंध पंचभूतात्मक विश्वतील घटनाना लागं पडतो. पुढचे समर्थाचे विचार बघा! हे विश्व निर्माण करणारा देव एकच आहे विश्वातील पदार्थाहून तो निराळाआहे. ज्या देवाने अनेक जीव निर्माण केले तो स्वतःच जीव कसा असू शकेल.विश्वतील पदार्थाहून तो निराळा आहे. जे जे कर्म माणसाला करावे लागते ते ते कर्म तो कधीच होऊ शकत नाही कर्म आणि ते करणारा कर्ता सतत भिन्नच असतात.

## प्रपंचात आपण साक्षित्वाने वागावे

आधुनिक केसरी

सत्य वस्तू ओळखणे हा परमार्थ, आणि असत्य वस्तूला सत्य मानून चालणे हा प्रपंच होय. आपल्याला वस्तू दिसते ती खरी असेलच असे नाही. पण ती मुळीच नाही असे मात्र नाही; ती काहीतरी आहे. एका दृष्टीने सत्य वस्तू अशी आहे की, प्रत्येकजण जे गुण त्या वस्तूला लावतो ते सर्व गुण तिच्या ठिकाणी आहेतच, शिवाय आणखी कितीतरी गुण तिच्या ठिकाणी आहेत; म्हणून ती निर्गुण आहे. दुसऱ्या दृष्टीने ती अशी आहे की, प्रत्येकजण जो गुण तिला लावतो तो कल्पनेनेच तिच्या ठिकाणी आहे असे आपण म्हणतो; म्हणून ती वस्तू गुणांच्या पलीकडे आहे. या अर्थानेसुद्धा ती निर्गुणच आहे. जशी आपल्या देहाची रचना, तशीच सर्व सृष्टीची रचना आहे. देहामधले पंचकोश सृष्टीमध्येदेखील आहेत. फरक एवढाच की, देहामध्ये ते मूर्त आहेत तर सृष्टीमध्ये ते अमूर्त स्वरूपात आहेत. भगवंताला एकट्याला करमेना म्हणून तो एकाचा अनेक झाला. त्याचा हा गुण माणसाने घेतला. आपण हौसेसाठी आपला व्याप वाढवितो. पण फरक हा की, भगवंताने व्याप वाढविला तरी त्यामध्ये



तो साक्षित्वाने राहिला, आणि आपण मात्र व्यापामध्ये सापडलो. भगवंत सुखदुःखाच्या पलीकडे राहिला, पण आपण मात्र दुःखात राहिलो. व्यापाच्या म्हणजे परिस्थितीच्या बाहेर जो राहील त्याला दुःख होणार नाही. खरे पाहिले तर व्यापातून वेगळेपणाने राहण्यासाठीच सर्व धडपड आहे. व्याप दुःखदायक न व्हावा असे वाटत असेल तर आपण साक्षित्वाने राहायला शिकले पाहिजे. आपण जगामध्ये व्याप वाढवितो, तो आनंदासाठी वाढवितो. पण भगवंताच्या व्यतिरिक्त असणारा आनंद हा कारणावर अवलंबून असल्याने ती कारणे नाहीशी झाली की तो आनंद मावळतो. यासाठी तो आनंद अशाश्वत होय. म्हणून खरा आनंद कोठे मिळतो ते पाहावे. जगणे म्हणजे शरीरात चैतन्य असणे होय. चैतन्य हे केवळ सच्चिदानंदात्मक आहे. म्हणून, जोपर्यंत आपण जिवंत आहोत तोपर्यंत स्वाभाविक आनंद असलाच पाहिजे. हा आनंद आपण भोगावा. ब्रह्मानंद आणि सुषुप्ती यांमध्ये फरक आहे. ब्रह्मानंद हा आहेपणाने आहे, तर सुषुप्तीचा आनंद हा नाहीपणाने आहे. आपल्याला झोप लागली की काय 'जाते' आणि जागे झालो की काय 'येते' हे नित्याचे असूनसुद्धा आपल्याला कळत नाही. भगवंताच्या इच्छेने सर्व होते आणि तोच सर्व करतो अशी भावना ठेवणे यासारखे समाधान नाही. कृतीमध्ये आनंद आहे, फळाच्या किंवा फळाच्या आशेत तो नाही. नामस्मरणरूपी कृती केली असता शाश्वत आनंदाचा सहज लाभ होईल.

**आजचे बोधवचन आहे - भगवंताच्या स्मरणात कर्तव्य केले की जीवनात आनंद उत्पन्न होतो. श्रीराम समर्थ**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

ऐसा ठाव नाहीं कोठें । देव उभाउभी भेटे ॥ध्रु.॥
आहेति सकळ । तीर्थे काळें देती फळ ॥२॥
तुका म्हणे पेठ । भूमिवरी हे वैकुंठ ॥३॥
तिर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनीं ॥१॥
मिळालिया संतसंग । समर्पितां भलें अंग ॥ध्रु.॥
तिर्थी भाव फळे । येथें आनाड तें वळे ॥२॥
तुका म्हणे पाप । गेलें गेल्या कळे ताप ॥३॥
घेऊनियां चक्र गदा । हा चि धंदा करी तो ॥१॥
भक्ता राखे पायापासीं । दुर्जनासी संहारी ॥ध्रु.॥

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, २५ एप्रिल २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# वणी येथील मुरमुरा कारखाना तत्काळ बंद करा

## वणी-सापुतारा रस्त्यावरील मुरमुरा कारखान्याला जानेवारीतच आरोग्यविभागाने दिली होती नोटीस

आधुनिक केसरी न्यूज

**दिंडोरी :** वणी सापुतारा रस्त्यावरील मुरमुरा कारखाना बंद करण्याची मागणी जिल्हाधिकारी यांचेकडे त्रस्त शेतकरी व व्यापारी यांनी करण्यापूर्वीच 12 जानेवारी 2023 रोजीच आरोग्यविभागाने मुरमुरा कारखान्याला नोटीस दिल्याचे पुढे आले आहे. दि. 10 जानेवारी रोजी सदर मुरमुरा कारखान्याचे दर्पयुक्त दुषित पाणी यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली होती. शेतकऱ्याच्या बोअरवेलमधे हे पाणी उतरले होते व त्यावेळी हातापाया पडुन पुन्हा असे होणार नाही, अशी ग्वाही मुरमुरा कारखानदाराने दिली व संबधितांनीही काहीअंशी डोळेझाक केली असे म्हणावयास वाव आहे .त्यावेळी पांडाणे प्राथमिक आरोग्य केन्द्राचे वैद्यकीय अधिकारी डा साबळे यांनी याची दखल घेतली होती व डॉ. एल. एस. साबळे , आर. पी. गांगुर्डे यांनी पाहणी केली असता फक्टरी भोवती असलेले ओपन ड्रेनेजमध्ये लारवा आढळल्या असुन यामुळे परीसरात डेंगू, चिकनगुनीया, या रोगांची साथ उद्‌भवन्याची शक्यता व्यक्त केली होती तसेच योग्य नियोजन करुन ड्रेनेजद्वारे विल्हेवाट लावण्याबाबत सुचित केल्याचा उल्लेख नोटीसमधे आहे. तसेच पाईप लाईनचे लिकेज तत्काळ बंद करणेबाबत तंबी दिली. तसेच परीसरात दुर्गंधी पसरणार नाही याची दक्षता घ्यावी. अन्यथा सर्वस्वी जबाबदार धरण्यात येईल, असे स्पष्टपणे लेखीस्वरुपात सुचित केले आहे. विशेष बाब म्हणजे ग्रामविकास आधिकारी सरपंच वणी ग्रामपालीका, तालुका वैद्यकीय अधिकारी दिंडोरी, तालुका गटविकास अधिकारी यांना या नोटीसची प्रत कार्यालयीन माहीतीसाठी देण्यात आलेली आहे. तीन महीन्यापेक्षा अधिक कालावधी यास लोटला आहे. केवळ कागदी घोडे नाचवत कारवाईचा आव आणुन पर्यावरण असमतोलीत करुन शेतकरी यांचा शेती व्यवसाय धोक्यात आणणार्या व नागरीकांच्या , आरोग्याशी खेळणार्या या मुरमुरा काराखान्याला नेमका आशीर्वाद कोणाचा याचे उत्तर शोधण्याची वेळ आली असुन एका शेतकऱ्याची निर्यातक्षम द्राक्षबागेला याचा फटका बसुन आर्थिक हाणी झाली आहे तर उग्र दर्प व दुषित पाणी यामुळे संसर्गजन्य आजार उदभवु शकतात याची जराही तमा न बाळगता गांभीर्य नसलेल्या संबधितांची चौकशी करण्याची वेळ वरीष्ठ आधिकारी यांचेवर आल्याने सखेद आश्चर्य व्यक्त केले जात आहे.



मुरमुरा कारखान्यामुळे निर्यातक्षम द्राक्ष बाग तोडण्याची आली शेतकर्यावर वेळ वणी सापुतारा रस्त्यावरील मुरमुरा कारखान्याच्या दुषित पाण्याचा फटका निर्यातक्षम द्राक्ष उत्पादक सचिन पवार यांना बसला .मुरमुरा तयार करण्याच्या प्रक्रीयेनंतरचे दुषित मोकळे सोडलेले पाणी विहीर व बोअरवेलमधे उतरले व हे दुषितपाणी द्राक्ष बागाना वापरावे लागले तसेच बायलरमधुन निघणारा दर्पयुक्त धुर द्राक्षांवर पडला त्यामुळे द्राक्षांवर काजळी पडली . द्राक्षाचा रंग बदलला रंगबदलण्यापुर्वी 60 रुपये प्रतिकीलो असा दर ठरला होता मात्र नंतर हे काजळीयुक्त द्राक्ष 15 रुपये किलोने विकावे लागले . सुमारे बारा लाख रुपयांचे नुकसान झाले .माझ्यावर बँकेचे बारा लाखाचे कर्ज आहे . मुरमुरा कारखान्यामुळे कमी दरात द्राक्ष विक्री करावी लागल्याने बँकेचे कर्ज भरायचे कोठुन त्यामुळे नाईलाजाने सदरची चार एकर द्राक्ष बाग तोडुन टाकली आहे सदर मुरमुरा कारखान्यावर कारवाई करावी व तो कायम स्वरुपी बंद करण्यात यावा नाहीतर लगतच्या शेतकऱ्यांच्या जमीनी मुरमुरा कारखानदाराने विकत घ्यावात बाजारमुल्यानुसार आम्ही विक्री करण्यास तयार आहोत .



माझे शेतजमीनीत टोमटो व कांदा उत्पादीत होतो मात्र मुरमुरा कारखान्याच्या दुषित पाणी व आगसादृष्य रेतीच्या धुरामुळे या पिकांचे नुकसान झाले आहे प्रशासनाने मुरमुरा कारखानदाराला पाठीशी न घालता त्वरीत कारवाई करावी .
**हर्षद जाधव, शेतकरी**
**सचिन पवार, द्राक्ष उत्पादक**

# नांदेड येथे आज स्व. मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमालेचे नववे पुष्प

## 'उन्हाळयाच्या सुट्या आणि हरवलेले मामाचे गाव' या विषयावर बंसल क्लासेसमध्ये प्रा. डॉ. बालाजी कोम्पलवार यांचे व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज



**नांदेड :** दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुरू असलेल्या व्याख्यानमालेचे नववे पुष्प नांदेड येथील मा. उपप्राचार्य, डॉ. बालाजी कोम्पलवार हे'उन्हाळ्याच्या सुट्या आणि हरवलेले मामाचे गाव' या विषयावर गुंफणार आहेत. मंगळवार, दि. 25 एप्रिल रोजी दुपारी 4 वाजता बंसल क्लासेस, आनंदनगर, नांदेड येथे होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बंसल क्लासेस नांदेडचे संचालक धीरज तोष्णीवाल यांची उपस्थिती राहणार आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांच्या संकल्पनेनुसार या वर्षीपासून स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या स्मृत्यर्थ मासिक व्याख्यानमाला आरंभ करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व बंसल क्लासेसच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या व्याख्यानास उपस्थितीचे आवाहन संयोजक प्रवीण जाधव, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे नांदेड जिल्हाध्यक्ष संग्राम मोरे, डॉ. प्रभू गोरे यांच्यासह कार्यकारिणीने केले आहे. प्रवेश सर्वांसाठी खुला आहे.





# नवीन महागडी कार पेट्रोल टाकून पेटवून दिली

आधुनिक केसरी न्यूज



**बुलढाणा :** घरासमोर उभी असलेली वीस लाखांची कार तिघा अज्ञात व्यक्तींनी पेटवून दिली. परिसरात असलेल्या 'सीसीटीव्ही'मध्ये कार जळणारे व क्षणार्धात पेटलेली चारचाकी टिपल्या गेली आहे. स्थानिय मच्छी ले आउटमधील वाघ हॉस्पिटलसमोर काल रात्री २ वाजताच्या आसपास ही घटना घडली. वाघ हॉस्पिटलसमोर राहणाऱ्या सुनील डोंगरे नामक व्यक्तीची महागडी नवीन कार अज्ञात ३ व्यक्तींनी पेट्रोल टाकून जाळून टाकली. कारची किंमत १५ ते २० लाख रुपये सांगण्यात येत आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# सातपुड्यात आढळले अद्‌भुत शिवलिंग

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** सातपुडा पर्वतरांगांमध्ये अमरावती जिल्ह्यातील मोर्शी नजीक सुमारे १६ वर्षांपूर्वी अश्मयुगीन चित्रगुहा आढळून आल्यानंतर आता अभ्यास आणि संशोधनातून अनेक नवनवीन बाबी समोर येत असून या परिसरात वैदिक संस्कृतीपूर्वीचे अद्‌भूत शिवलिंग आढळून आले आहे. त्याची लाल रंगाने पूजा होत असल्याच्या स्पष्ट खुणा दिसतात, असा दावा संशोधकांच्या चमूने केला आहे.

येथील ज्येष्ठ संशोधक डॉ. व्ही.टी. इंगोले यांच्या नेतृत्वाखाली संशोधकांच्या चमूला सातपुडा पर्वतराजीत २००७ मध्ये सुमारे १५ हजार वर्षांपूर्वीच्या अश्मयुगीन चित्रगुहा आढळून आल्या होत्या. हा ठेवा सर्वप्रथम याच चमूने जगासमोर आणला होता. हा चित्रगुहेचा परिसर अमरावतीपासून जवळपास ८० किलोमीटर आणि मोर्शीवरून अंदाजे २० किलोमीटर अंतरावर आहे. आता १६ वर्षा नंतरही चित्रगुहेचा अभ्यास आणि संशोधनावरून अनेक महत्त्वाच्या बाबी पुढे येत आहेत. अनेक गूढ गोष्टी डोंगर कपारीत दडलेल्या असू शकतात. त्यातील अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे त्या परिसरात वैदिक संस्कृतीपूर्वीचे शिवलिंग आढळून आले आहे आणि त्याची लाल रंगाने पूजा होत असल्याच्या स्पष्ट खुणा दिसतात.



# ओवेसींचे प्रत्युत्तर

आधुनिक केसरी

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मोठी घोषणा केली आहे. तेलंगणातील मुस्लिम आरक्षण घटनाबाह्य असल्याचे अमित शाहा यांनी म्हणाले. भाजपची सत्ता आल्यास तेलंगणातील मुस्लिम आरक्षण रद्द केले जाईल, असे अमित शहा म्हणाले. तेलंगणात रविवारी (23 एप्रिल) झालेल्या विजय संकल्प सभेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी तेलंगणाचे मुख्यमंत्री केसीआर यांना फटकारले. सोबतच केसीआर हे एआयएमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांच्या 'अजेंडा'वर चालत असल्याचा आरोप केला. हैदराबादजवळ चेवेल्ला येथे विजय संकल्प सभा रॅलीला अमित शाह यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केलं. एआयएमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांच्या विचारांप्रमाणेच केसीआर चालत असल्याचा आरोप त्यांनी केला. भाजपचे सरकार सत्तेवर आल्यावर हे असंवैधानिक मुस्लिम आरक्षण रद्द केले जाईल. हा अधिकार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसींचा आहे आणि त्यांना त्यांचा हक्क मिळेल आणि आम्ही मुस्लिम आरक्षण रद्द करु, केसीआरच्या सरकारने मुस्लिम कोटा 4 टक्क्यांवरुन 12 टक्क्यांपर्यंत वाढवण्याच्या निर्णय घेतला आणि त्याच पार्श्वभूमीवर अमित शाहांनी केसीआर यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. 'तेलंगणा मुक्ती दिन' साजरा न केल्याबद्दल शाह यांनी केसीआर यांच्यावर हल्लाबोल केलाच शिवाय भाजप सत्तेवर आल्यानंतर हैदराबादच्या परेड ग्राऊंडवर हा दिवस भव्य पद्धतीने साजरा केला जाईल असे आश्वासनही दिले. ओवेसींच्या पक्षाला खूश करण्यासाठी तेलंगणा सरकार काश्मीरचा संपूर्ण नकाशाही दाखवत नाही, असा आरोपही अमित शाह यांनी केला. अमित शाह म्हणतात 'हा भारताचा अपमान आहे'. केसीआर यांचे पंतप्रधान होण्याचे स्वप्न कधीही पूर्ण होऊ शकत नाही, ती जागा अद्याप रिक्त नाही असे म्हणत शाहांनी पुन्हा फटकारले. केसीआर, 2024 मध्ये देखील नरेंद्र मोदी पूर्ण बहुमताने पंतप्रधान होणार आहेत. त्यापूर्वी, तेलंगणातील विधानसभा निवडणुकीचा ट्रेलर असेल आणि इथे भाजपचे सरकार निवडून येईल, असे अमित शाह यांनी केसीआर यांना उद्देशून म्हटले. तेलंगणातील लोकांना तुमचा आणि तुमच्या कुटुंबाने केलेला भ्रष्टाचार माहिती झाला आहे. सरकारी निधीचा मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होत आहे. तुमच्या आजूबाजूचे लोक मुख्य आरोपी आहेत आणि घोटाळ्यात गुंतलेले आहेत. लक्ष विचलित करण्यासाठी त्यांनी टीआरएस ते बीआरएस केले, असे अमित शाह म्हणाले. दरम्यान केसीआर यांनी अलिकडेच स्थापन केलेल्या पक्षाचे नाव बदलून भारत राष्ट्र समिती केले आहे. दरम्यान, ओवेसी यांनी शाह यांच्या दाव्यावर प्रत्युत्तर देताना म्हटले की, आमच्यावर बोलण्यापेक्षा शाहांनी महागाई आणि बेरोजगारीबद्दल बोललं पाहिजे. ओवेसींनी ट्वीट करत अमित शाह यांना हे प्रत्युत्तर दिले आहे. मुस्लिमविरोधी द्वेषयुक्त भाषणाशिवाय भाजपकडे तेलंगणासाठी कोणतंही व्हिजन किंवा अजेंडा नाही. ते फक्त बनावट चकमकी, हैदराबादवर सर्जिकल स्ट्राइक, कर्फ्यू, गुन्हेगारांची सुटका आणि बुलडोझर देऊ शकतात. तुम्ही तेलंगणातील लोकांचा इतका द्वेष का करता? असे ओवेसी यांनी ट्वीटमध्ये म्हटले आहे. मागास मुस्लिम गटांसाठी आरक्षण हे प्रायोगिक डेटावर आधारित आहे. कृपया सुधीर आयोगाचा अहवाल वाचा. आपण करु शकत नसल्यास, कृपया ज्याला शक्य असेल त्याला विचारा. SC च्या स्थगितीअंतर्गत मुस्लिमांसाठी आरक्षण चालू आहे.

# ईशान्य भारत 'विकासाचे प्रवेशद्वार'



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**२०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्ता हाती घेतल्यानंतर ईशान्य भारताच्या संपूर्ण विकासाची नवी गाथा लिहिल्या गेली आहे. ईशान्येबाबत दिल्लीच्या विचारसरणीतील या बदलाचा परिणाम म्हणजे ईशान्य आता भारताच्या विकासाचे प्रवेशद्वार बनत आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतर, पंतप्रधान झाल्यानंतर इतर सर्व पंतप्रधानांनी ईशान्येकडील राज्यांना भेटी दिल्या त्यापेक्षा जास्त वेळा एकट्या नरेंद्र मोदींनी ईशान्येचा दौरा केलेला आहेत. पीएम मोदींनी सुमारे ५१ वेळा ईशान्येकडील राज्यांचा दौरा केला आहे. दर १५ दिवसांनी एक किंवा दुसरा केंद्रीय मंत्री ईशान्येला भेट देऊन तेथील विकासकामांचा आढावा घेत आहे.**




त्यामुळे येथील विकासाला गती मिळत आहे. 'वोकल फॉर लोकल' आणि 'लोकल फॉर ग्लोबल' या पंतप्रधान मोदींच्या मंत्राने ईशान्येच्या विकासाला चालना दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी HIRA म्हणजेच महामार्ग, अंतर्देशीय जलमार्ग, रेल्वे आणि हवाई मार्गाच्या विकासावर भर दिला आहे. यामुळे ईशान्येकडील राज्ये, उर्वरित भारत आणि दिल्ली यांच्यातील हार्टलँड अंतर कमी झाले आहे. डिजिटल कनेक्टिव्हिटीद्वारे ईशान्येतील युवा शक्तीसाठी नवीन संधी निर्माण होत आहेत. २०१४ च्या तुलनेत, ऑप्टिकल फायबरचे कव्हरेज ईशान्येमध्ये जवळजवळ ४ पट वाढले आहे. मोबाईल कनेक्टिव्हिटीसाठी हजारो मोबाईल टॉवर बसवले जात आहेत. ईशान्येकडील आदिवासी भागात १५० हून अधिक एकलव्य मॉडेल शाळा बांधल्या जात आहेत. या अर्थसंकल्पात एकलव्य मॉडेल स्कूलमधील ३८,८०० शिक्षकांच्या भरतीसाठीही तरतूद करण्यात आली आहे. पर्वतमाला योजनेमुळे येथील प्रेक्षणीय स्थळांमध्ये सोयी वाढणार असून पर्यटनाचाही विकास होणार आहे. खेळांच्या बाबतीतही केंद्र सरकार एक नवीन दृष्टिकोन घेऊन पुढे जात आहे, ज्याचा सर्वाधिक फायदा ईशान्येला झाला आहे.

ईशान्येकडील राज्ये शांततेच्या दिशेने वाटचाल करत आहेत गेल्या ८ वर्षांत अनेक संघटनांनी हिंसाचाराचा मार्ग सोडून कायमस्वरूपी शांततेचा मार्ग स्वीकारला आहे. ईशान्येत AFSPA ची गरज भासू नये यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. ते हटवण्यासाठी परिस्थिती निर्माण केली जात असल्याचे खुद्द पंतप्रधान मोदींनी जाहीर केले आहे. जवळपास ६० टक्के भागातून AFSPA हटवण्यात आला. डिस्टर्बड एरिया नोटिफिकेशनचे क्षेत्रही खूप मर्यादित झाले आहे. ईशान्येत, ८,०००हून अधिक अतिरेक्यांनी आपले शस्त्र ठेवले आणि शांतता आणि शांततेचा मार्ग स्वीकारला. NLFT करार, बोडो करार, कार्बी-ऑनलाँग करार, ब्रु-रिआंग करार - या सर्व करारांमुळे ईशान्येत शांतता आणि विकास प्रस्थापित करण्यात खूप मदत झाली आहे. स्वातंत्र्यानंतर देशात आणि आधीच्या सरकारांमध्ये बराच काळ असा विचार होता की सीमाभागात विकास झाला तर शत्रूला फायदा होईल. या नकारात्मक विचारसरणीमुळे ईशान्येसह देशाच्या सर्व सीमावर्ती भागात कनेक्टिव्हिटी सुधारू शकली नाही.तरच अनेक दशकांपासून सुरू असलेला राज्यांमधील सीमावाद मिटणार आहे. मोदी सरकारसाठी ईशान्य हा शेवटचा बिंदू नसून सुरक्षा आणि समृद्धीचे प्रवेशद्वार आहे. व्हायब्रंट बॉर्डर व्हिलेज अंतर्गत सीमावर्ती गावांमध्ये चांगल्या सुविधा विकसित करण्यावर भर दिला जात आहे. पीएम मोदींनी त्यांच्या एका निवडणूक रॅलीत सांगितले होते की, आतापर्यंत देशातील सरकारे ईशान्येसाठी 'विभाजन' करण्याचा विचार करत होते आणि आम्ही 'दैव' या हेतूने आलो आहोत. DEVINE योजनेद्वारे कायाकल्प होत आहे. PM-दिव्य योजनेमध्ये २०२२-२३ ते २०२५-२६या चार वर्षांच्या कालावधीत (१५ व्या वित्त आयोगाच्या मुदतीची उर्वरित वर्षे) ६,६०० कोटी रुपये खर्चाचा समावेश असेल. यासोबतच २०२५-२६- पर्यंत पीएम-डिव्हाईन प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

**आदिवासी समाजाचा विकास**

मोदी सरकारचा हाअजेंडा असून, सर्व समुदाय आणि प्रदेशांमधील सर्व प्रकारची भेदभाव दूर करणेआहे. ईशान्येत, भाजपचा दावा आहे की ते विकास कॉरिडॉर बनवत आहेत, विवादांसाठी सीमा नाही. पक्षाच्या शांतता आणि विकासाच्या धोरणाचा सर्वाधिक फायदा आदिवासी समाजाला झाला आहे. आदिवासी समाजाची परंपरा, भाषा, खाद्यसंस्कृती जपत आदिवासी भागाच्या विकासाला आपले प्राधान्य आहे. बांबूला झाडाच्या श्रेणीतून काढून गवताच्या श्रेणीत आणले. यामुळे बांबूशी संबंधित आदिवासी उत्पादनांच्या निर्मितीला चालना मिळाली. येथे अनेक वन धन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. ज्यांनी मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला होता, त्यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदींवरील विश्वास व्यक्त करत लोकशाहीच्या या उत्सवात सहभाग घेतला, हे नरेंद्र मोदी सरकारच्या प्रयत्नांचे फलित आहे. ईशान्येकडील प्रदेशाने गेल्या सहा वर्षांत कृषी उत्पादनांच्या निर्यातीत ८५ टक्के वाढ नोंदवली आहे. ईशान्य क्षेत्रातून कृषी उत्पादनांची निर्यात २०१६-१७ या आर्थिक वर्षातील $2.52 दशलक्षवरून २०२१-२२या आर्थिक वर्षात $17.2 दशलक्ष इतकी वाढली आहे. ईशान्येकडील प्रदेशाने गेल्या सहा वर्षांत कृषी उत्पादनांच्या निर्यातीत ८५ टक्के वाढ नोंदवली आहे. APEDA ने क्षेत्रातील ८० नवोदित उद्योजक आणि निर्यातदार, शेतकरी उत्पादक संस्था (FPOs) आणि शेतकरी उत्पादक कंपन्या (FPCs) आणि राज्य सरकारचे अधिकारी, कौशल्य विकास आणि अन्न प्रक्रिया प्रशिक्षण, फलोत्पादन उत्पादनांचे मूल्यवर्धन इत्यादीसारख्या विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. प्रकल्पही सुरू झाले आहेत.

**कनेक्टिव्हिटी वाढवण्याचे प्रयत्न**

ईशान्य रेल्वेने १०० टक्के विद्युतीकरणाचे लक्ष्य गाठले आहे. १०० वर्षांनंतर मेघालयला दुसरे रेल्वे स्थानक मिळाले. ईशान्येकडील राज्यांना 'ॲक्ट-ईस्ट' परराष्ट्र धोरणाचा लाभ मिळत आहे. इंडो-म्यानमार-थायलंड सुपर हायवे हा त्याचाच परिणाम आहे. ईशान्येकडील विमानतळांची एकूण संख्या १६ झाली आहे. १९४७ ते २०१४ पर्यंत या ईशान्य भागात फक्त ९ विमानतळ बांधले गेले. यापूर्वी दुर्गम सीमावर्ती गावे ही शेवटची गावे मानली जात होती, मात्र मोदी सरकारने सीमाभागातील गावांना देशातील पहिली गावे मानून काम केले आहे. अशा परिस्थितीत ईशान्येचा विकास हा सरकारचा प्राधान्यक्रम बनला आहे. पर्यटन असो वा व्यापार, दूरसंचार असो वा कापड, ईशान्येला सर्वोच्च प्राधान्य मिळते. २०१७ मध्ये उत्तर पूर्व औद्योगिक विकास योजना सुरू करण्यात आली. या अंतर्गत ३,०००कोटी रुपये खर्चून सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देण्यात आले. ईशान्येकडील पर्वतीय क्षेत्राच्या विकासासाठी ९० कोटींची योजना आणली. या योजनेचा विशेषतः मणिपूर, त्रिपुरा आणि आसामच्या डोंगराळ भागांना फायदा झाला. ईशान्येतील गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी२०१७ मध्ये १२ वी नॉर्थ ईस्ट बिझनेस समिट आयोजित केली.

# ट्विटरने हटवली सिलिब्रेटींची ब्लू टिक



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**सध्याचे युग हे सोशल मीडियाचे युग आहे हे आपण जाणतोच. सोशल मीडियाच्या या युगात जो तो सोशल मीडिया साईटवर सक्रिय राहून आपण किती सोशल आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न करतो. व्हाट्सएप, फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर या सारख्या सोशल माध्यमांवर सक्रिय राहणाऱ्यांची संख्या अब्जावधींच्या घरात आहे. स्वतःचे विचार हजारो, लाखो लोकांपर्यंत पोहचवण्याचे प्रभावी साधन म्हणजे सोशल मीडिया. लहानांपासून थोरांपर्यंत जो तो सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यक्त होतो.**

अतिषय कमी शब्दात आणि कमी वेळेत आपले विचार लोकांपर्यंत पोहचवण्याचे काम ट्विटर सारखी सोशल मीडिया साईट करते म्हणूनच जगातील प्रत्येक सिलिब्रेटींचे ट्विटरवर अकाउंट आहे व त्याद्वारे ते आपले विचार लोकांपर्यंत पोहचवत असतात. काही सिलिब्रेटींचे तर ट्विटर वर लाखो करोडो फॉलोअर्स आहेत. एका क्षणात या फॉलोअर्सपर्यंत पोहचण्यासाठी सिलिब्रेटी ट्विटरचा आधार घेतात. इतर सोशल मीडियावर जसे सिलिब्रेटींचे फेक अकाऊंट आहेत तसे ते ट्विटर वर पण आहेत पण सिलिब्रेटींचे अधिकृत अकाउंट कोणते हे ओळखण्यासाठी त्यांच्या अकाउंट समोर ब्लू टिक असते. ब्लु टिक असलेले अकाउंट हे त्या सिलिब्रेटींचे अधिकृत अकाउंट असते मात्र ट्विटरने आता अनेक सिलिब्रेटींची हीच ब्लु टिक हटवली आहे. ब्लु टिक हटवल्याने अनेक सिलिब्रेटींनी नाराजी व्यक्त केली असली तरी ट्विटरचे प्रमुख ॲलन मस्क यांनी स्पष्टच सांगितले आहे की जोवर हे सिलिब्रेटी ब्लु टिकसाठी असणारे मासिक भाडे ८ डॉलर म्हणजे ६६५. ७७ रुपये भरणार नाही तोवर त्यांना ब्लु टिक मिळणार नाही. ट्विटरने ब्लु टिक हटवलेल्या सिलिब्रेटींमध्ये उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, उद्योगपती रतन टाटा, क्रिकेटपटू विराट कोहली, सिने अभिनेते अमिताभ बच्चन, शाहरुख खान, सलमान खान, प्रियांका चोप्रा, रजनीकांत, ऋतिक रोशन यांच्यासह हजारो सिलिब्रेटींचा समावेश आहे. वास्तविक जेंव्हा ॲलन मस्क यांनी ट्विटरचे अधिग्रहण केले तेंव्हाच त्यांनी हे सांगितले होते की ब्लु टिकसाठी सिलिब्रेटींना मासिक भाडे द्यावे लागेल मात्र आपल्या सिलिब्रेटींनी नेहमीप्रमाणे त्याकडे दुर्लक्ष केले. ॲलन मस्क




हे पक्के व्यावसायिक असून आपला व्यवसाय चालवताना ते कुणाचीही दयामया करीत नाही. आपल्या नेटवर्कस साईटचे युजर्स कोणीही असो मग ते चित्रपट क्षेत्रातले असोत की राजकारणातले, खेळाडू असोत की उद्योगपती त्यांना काहीही फरक पडत नाही. आपल्या व्यवसायामध्ये ते कोणाचीही फारसी दखल घेत नाही. सिलिब्रेटी असल्याने मोफत किंवा सेवेमध्ये सूट देत नाही. सिलिब्रेटींचे लाड फक्त आपल्या देशातच होतात. आता आपल्या देशातही सिलिब्रेटींचे लाड बंद करायला हवेत. सर्वसामान्य नागरिकांसाठी जे नियम आहेत तेच सिलिब्रेटींसाठीही असायला हवेत. सिलिब्रेटी आहेत म्हणून त्यांना नियमात सूट मिळायला नको. कायद्यासमोर सर्व समान आहेत हे फक्त कागदावर नको तर प्रत्यक्षात दिसायला हवे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गाला नामांतराचा विसर..!

## धुळे सोलापूर क्र. 52 राष्ट्रीय महामार्ग लगतच्या शहराची नावे दर्शविणारा फलक

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 16 जुलै 2022 रोजी औरंगाबाद आणि उस्मानाबाद या दोन्ही शहरांची नावे बदलण्याचा ठराव मंजूर केला. राज्यातील औरंगाबाद आणि उस्मानाबाद या शहरांच्या नामांतराच्या शिंदे सरकारच्या निर्णयाला केंद्राकडूनही 24 फेब्रुवारी 2023 रोजी मंजुरी मिळाली. त्यानंतर उस्मानाबादचे शहराचे धाराशिव तर औरंगाबाद शहराचे नामकरण छत्रपती संभाजीनगर, असे करण्यात आले आहे.

या नामांतराच्या शासनाच्या निर्णयानंतर धाराशिव तसेच छत्रपती संभाजी नगर शहरातील बहुतांश शासकीय निमशासकीय कार्यालयाची रबरी शिक्क्यापासून ते कार्यालयाच्या पत्ता बदलण्यापर्यंत सर्वच ठिकाणी नावे बदलण्यात आले आहेत.

औरंगाबाद व उस्मानाबाद या शहराचे नावे बदलाला केंद्राची मंजुरी येताच, दोन्ही शहरामध्ये फटाक्याची आतिश बाजी करून, नागरिकांमधून एकमेकांना पेढे भरवत या धाराशिव व छत्रपती संभाजीनगर या नावाचे स्वागत करण्यात आले. एस टी महामंडळाकडूनही बस स्थानकासोबत बस गाड्यांच्या तसेच बस पाट्यांचे तात्काळ नावे बदलून स्वागत करण्यात आले.

पण आज त्याच बस राष्ट्रीय महामार्ग सोलापूर-धुळे क्र 52 वरून धावत असतात. मात्र या सोलापूर ते धुळे पर्यंत असणारे जुन्या नावाचे फलक आजपर्यंत देखील बदलण्यात आलेले नाहीत. सोलापूर_धुळे या राष्ट्रीय महामार्गाचे कंत्राट असणाऱ्या आयआरबी कंपनीला नावं बदलण्याचा विसर पडलेला नाहि ना, असेच या महामार्गावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांमधून बोलले जात आहे.







आधुनिक केसरी कडून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाला याबाबत विचारणा केली असता आम्हाला धाराशिव व छत्रपती संभाजी नगर या नावा बाबतचे परिपत्रक केंद्र शासनाकडून आले नसल्याचे सांगण्यात आले.

# संभाजी कॉलनीमध्ये महिन्यापासून खोदून ठेवली पाण्याची लाईन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सिडकोतील एन ६ ई सेक्टर संभाजी कॉलनीमध्ये ड्रेनेज मिश्रित पाणी नळाद्वारे येत असल्याची समस्या निर्माण झाली होती. या समस्ये बाबत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( सचिन खरात ) गटाचे जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांनी मनपा पाणी पुरवठा विभाग व मनपा वार्ड अभियंता यांच्यासोबत संपर्क करून समस्या सोडवण्याची विनंती केली. त्यानंतर मनपा मार्फत संभाजी कॉलनीमध्ये फक्त खड्डे करून ठेवले काम मात्र शून्य आहे. त्याला पण आता एक महिना उलटून गेला आहे.. एक महिन्यापासून ई सेक्टर च्या गल्ल्यांमध्ये पाण्याची अडचण न निर्माण झाली आहे. संपूर्ण गल्लीमध्ये खड्डे केल्याने लोकांना ये जा करण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. शिवाय ड्रेनेज लाईन खुली झाल्याने त्याला गळती लागली आणि ते पाणी खड्यात साचून परिसरात दुर्गंधी. डास. वाढल्याने नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. खोदलेल्या खड्ड्यांमुळे लहान मुले या खड्ड्यात पडून दुर्घटना घडू शकते. मनपाच्या या कामाकडे कोणाचे लक्ष नाही. एक महिना झाला काही घरांना दुसरीकडून पाणी भरण्याची वेळ आली आहे. वारंवार विनंती करून देखील आज करू उद्या करू, अशी उत्तरे मिळत आहे ही समस्या तत्काळ सोडवा नसता मनपा कार्यालयासमोर जन आंदोलन करावे लागेल असा इशारा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( सचिन खरात ) गटाचे जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांनी मनपा प्रशासनाला दिला आहे.



# वैजापुरात भगवान परशुराम जन्मोत्सव उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** भगवान श्री परशुराम जयंती निमित सकल ब्राम्हण समाजाच्या वतीने शनिवार( ता.२२ ) रोजी रुग्णाना फळ वाटप, महादेव मंदिरात महापूजा, महाप्रसाद व सायंकाळी ढोल च्या लयबद्ब संगीत व संचलनात श्री भगवान परशुराम यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. परशुराम भगवान की जय, जय श्रीराम, अशा घोषण देत ही शोभा यात्रा काढण्यात आली. सकल ब्राम्हण समाजाच्या महिला व पुरुषांनी भगवे फेटे परिधान केले होते. तर हातात भगवान परशुराम यांचे चित्र असलेले ध्वज होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या जवळ उत्सव समिती अध्यक्ष डॉ. अश्विन जोशी, सुधीर लालसरे, राजू लालसरे, अक्षय कुलकर्णी , मनोज दिवाकर, सोमन लालसरे, नंदकिशोर मेधे, राजू मेधे, प्रशांत कन्गले, प्रमोद कुलकर्णी, रमेश भालेराव, हरिदास वकील यानी प्रमुखांचे स्वागत केले. नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी, उपनगराध्यक्ष साबेरखान, बैंक



चेअरमन विशाल संचेती, नगरसेवक दशरथ बनकर, गणेश खैरे, शैलेश चव्हाण, प्रकाश चव्हाण, माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत, दिनेश राजपूत, पारस घाटे, दामू परिख, खुशालसिंह राजपूत, स्वप्निल जेजुरकर, राजेश गायकवाड, राजेन्द्र हरिदास वकील, भिमा साखरे, प्रमोद निकाले, रमेश त्रिभुवन तसेच सकल ब्राम्हण, महिला व पुरुष, युवा वर्ग व समस्त वैजपूरकर यांची या प्रसंगी उपस्थिती होती.

# म्हैसमाळ येथील तलावात बुडून युवकाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** म्हैसमाळ येथे मित्रासोबत आलेल्या २२ वर्षीय युवकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. अग्निशमन दल व पोलीसांच्या मदतीने दोन तासाच्या अथक परिश्रमानंतर मृतदेह तलावातून काढण्यात यश मिळाले आहे.

याबाबत पोलीसांनी दिलेली अधिक माहिती अशी की, छत्रपती संभाजीनगर येथील इंदिरानगर गारखेडा परिसरात राहणारा अरबाज सलीम पठाण वय २२ हा आपल्या चार मित्रासह दुपारी ३ वाजेच्या दरम्यान खुलताबाद-म्हैसमाळ येथे फिरण्यासाठी आला होता. म्हैसमाळ जात असतांना घाटाखालील काळा तलावातील पाणी बघून अरबाज पठाण याला अंघोळ करण्याचा मोह झाला. त्याला पोहता येत नसतांना ही तो पाण्यात उतरला पाण्यातील खोलीचा अंदाज न आल्याने तो पाण्यात बुडू लागला सोबतच्या मित्रांनी आरडाओरड करत असतांना तो पाण्यात बुडाला दरम्यान यावघटनेची माहिती पोलीसांना



दिली पोलीसांनी अग्नीशमन दलास पाचारण केले तब्बल दोन तासाच्या अथक परिश्रमानंतर अरबाज पठाण याचा मृतदेह ५:३० मिळून आला व खुलताबाद ग्रामीण रूग्णालयात शवविच्छेदनासाठी आणण्यात आले. सदरील घटनेची खुलताबाद पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. म्हैसमाळ घाटाखालील काळा तलावातून गेल्या दोन वर्षापुर्वी मोठ्या प्रमाणात गाळकसाई ( माती ) काढल्याने हा तलाव विहिरीसारखा खोल झाला असल्याने सदरील तलाव धोकादायक असल्याने पर्यटक व भाविकांनी तलावात पोहण्यासाठी उतरू नये असे आवाहन प्रशासनाने केलेले आहे.

महाराष्ट्र Business Katta


तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

EPFO
EPS-1995
Option Form
Before 01.09.2014
After 01.09.2014
ऑनलाईन फॉर्म आमच्याकडे भरुन मिळेल
कागदपत्र-पी.पी.ओ.नंबर, यु.ए.एन.नंबर, आधार कार्ड ( मोबाईल लिंक असणे गरजे ), ई-मेल आय., बँक पासबुक.
AADHAAR
आधार सेवा केंद्र
• जन्म तारिख • नावात बदल
• मोबाईल नंबर • पत्यात बदल
• मेल आय.डी. • लग्नानंतरचे नाव
आधार काढून १०वर्ष झाली असेल तर अपडेट करुन मिळेल.
अधिक माहितीसाठी संपर्क संचालक-दत्ता जाधव
महा ई-सेवा केंद्र
आपले सरकार सेवा केंद्र
मो. ९ ४ ० ३ ३ ४ ५ ७ ३ ९


CAFÉ ROCKSTARZ
EAT . CHILL . REPEAT
11:11
ELEVEN ELEVEN
Where Dishes come True..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928





# बीज... वृक्षरूपी संतान प्राप्तीसाठी अंकुर




मागीगर्भसंभव सामग्री बघताना आपण मागील लेखांमध्ये रसधातू बद्दल माहिती प्राप्त केली, या लेखामध्ये आपण बीज, रोपटे बनायला कारणीभूत असणारे बीज याबद्दल विशेष माहिती घेणार आहोत.

उत्कृष्ट प्रतिचे झाड हे तेव्हाच बनते जेव्हा बीज उत्तम प्रतीचे असते, नवीन पिढी घडवताना देखील उत्तम गर्भ घडविण्यासाठी स्त्री आणि पुरुष हे दोन्ही बीज परिपूर्ण गुणांनी युक्त असणे गरजेचे असते.

निरोगी आणि सुदृढ बीज हे उत्कृष्ट प्रतीचे गर्भ बनवण्यास कारणीभूत ठरतो. निकृष्ट प्रतीचे बीज असेल तर कितीही चांगली माती असू देत, कितीही उत्कृष्ट हवामान असू देत आणि पाण्याचीही योग्य सोय असू देत परंतु ते वृक्ष फलदायी ठरत नाही. त्याचप्रमाणे स्त्री आणि पुरुष या दोघांचीही बीज स्वस्थ आणि रोगमुक्त असणे म्हणजे आई होण्याचा मार्ग जणू सुकर करणे होय. चांगल्या प्रतीचे स्त्रीबीज हे स्त्रीला येणाऱ्या नियमित मासिक पाळी वरून, तिच्या फॉलिक्युलर स्टडीवरून, वय, आहार आणि योग्य प्रकारची जीवनशैली या घटकांवर अवलंबून असते. याच प्रमाणे पुरुषबीज देखील वीर्य उत्पत्ती वर, वय, आहार आणि निरोगी अशा जीवनशैली या घटकांवर अवलंबून असते. स्त्री बीज आणि पुरुष बीज दोन्ही देखील संरचनात्मक आणि कार्यात्मक सुयोग्य असतील तरच उत्तम प्रतीचा गर्भ स्त्रीच्या गर्भाशयामध्ये बनत असतो. आयुर्वेदिक गर्भसंस्कारामध्ये आम्ही त्या जोडप्याला विशिष्ट अशा टेस्ट करून घ्यायला लावतो, म्हणजे आधुनिक परिमाणतेच्या तुलनेत स्त्री बीज आणि पुरुष बीज उत्तम असल्याचे आपल्याकडे पुरावे राहतात, जर स्त्रीबीज आणि पुरुष बीज यामध्ये काही दोष आढळले रचनात्मक किंवा कार्यात्मक तर आपण बीज शुद्धी या अत्यंत महत्त्वाच्या बीज संस्कारातील पायरीकडून पुढे चिकित्सेला प्रारंभ करतो. बीज ही गर्भसंस्कारामधील अत्यंत महत्त्वाची पहिली पायरी आहे. या बीजशुद्धी द्वारेच स्त्रीबीज आणि पुरुष बीज निरोगी, उत्कृष्ट गुणसूत्रांनी युक्त असे बनवले जाते, असे हे उत्तम प्रतीचे स्त्रीबीज आणि पुरुषबीज योग्य अशी गर्भधारणा ठेवण्यासाठी माफक ठरते. बीज शुद्धीमुळे अनेक अनुवंशिक आजारांवर देखील प्रतिबंध मिळवता येतो, वारंवार होणाऱ्या गर्भपातावर देखील उपाय करता येतो, वंध्यत्वाच्या चिकित्सेमध्ये बीजशुद्धी हा आयुर्वेदाच्या पंचकर्माचा मुलाधार आहे. गर्भ संस्कारामधील बीजसंस्कारामध्ये मोडला जाणारा बीजशुद्धी हा एक महत्त्वाचा टप्पा होय. बरेचदा असे लक्षात येते स्त्रीमध्ये रचनात्मक आणि कार्यात्मक सर्व गोष्टी ठीक असतात परंतु पुरुषामध्ये दोष असतात, आणि वर्षानुवर्ष स्त्रीवरच चिकित्सा करत असतात. तर काही ठिकाणी असेही आढळते की स्त्रीबीज खराब असते आणि त्या स्त्रीला योग्य अशी चिकित्सा मिळत नाही. असे आपण सगळीकडे ऐकतो की आयुर्वेदामध्ये मुळापासून रोग दूर केले जातात. वंध्यत्वाच्या बाबतीत देखील हाच नियम लागू पडतो, आयुर्वेदिक चिकित्सेमध्ये मुळापासून स्त्रीबीज आणि पुरुष बीज याचा अभ्यास करून त्यावर चिकित्सा केली जाते. काही कारणास्तव जर IUI आणि IVF करण्याचा निर्णय जरी घेतला तरी सुरुवातीपासूनच जर बीज संस्कार केले तर IUI आणि IVF चे उत्तम रिझल्ट पहावयास मिळतात. याच कारणाने आता आधुनिक शास्त्राने देखील आयुर्वेदिक बीज शुद्धीचा मार्ग निवडलेला आहे, आमच्याकडे बरीच जोडपे बीज शुद्धीसाठी येतात चिकित्सा घेतात, यामुळे बरेचदा बीज शुद्धी केल्याने IUI आणि IVF करण्या अगोदरच नैसर्गिकरित्या गर्भधारणा राहते. या लेखमालेचा उद्देश एकच की प्रत्येक जोडप्याने आपल्याला नैसर्गिकरित्या गर्भधारणा राहू शकते यावर विश्वास ठेवावा, कुठलीही ट्रीटमेंट घेण्या अगोदर एकदा आयुर्वेदिक बीज संस्काराचा आधार घ्यावा.ती पाहूया.



**डॉ. मंगल सुरेश ताठे**
**[एम. डी.आयुर्वेद ] मो.9168101060**
**संचालक- शारदा क्लिनिक संचलित शाश्वत आयुर्वेद व गर्भसंस्कार चिकित्सालय, पिसादेवी, छत्रपती संभाजीनगर**
**फाउंडर - स्त्री वैद्या संचलित आयु पंख संघटना**

# आयुर्वेद अंगीकारून उन्हाळ्यातील आरोग्य जपा



वसंत आणि ग्रीष्म हे दोन ऋतू म्हणजेच "उन्हाळा" होय.आहार, आचरण आणि औषधी या त्रिसूत्रीला अनुसरून अवश्य ते बदल केले तर उन्हाळ्याची झळ त्रासदायक ठरणार नाही. एकंदर पृथ्वीचे तापमान हळूहळू वाढत आहे, असा इशारा वैज्ञानिक देत आहेत हे आपण ऐकतो वाचतो उन्हाळा हा त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा कालावधी असतो. अविचाराने केलेल्या पाण्याचा वापरापासून, तोडलेल्या झाडापर्यंत सर्वच गोष्टीचे परिणाम उन्हाळ्यात सोसावे लागतात.

सर्वप्रथम उन्हाळ्यामुळे शरीरात काय बदल होतात ते आपण थोडक्यात पाहू. उन्हाळा येतो हिवाळ्यानंतर. जशी जशी थंडी कमी कमी होत जाईल, तशी तशी जठराग्नी शक्ती अर्थात पचनशक्ती कमी कमी होत जाते. वाढलेल्या उष्णतेने जसे नद्या, झऱ्याचे पाणी कमी होते, विहिरीचे पाणी खोल जाते, तसे शरीराचे प्रींणन करणारा, तृप्ती देणारा रसधातूही अशक्त होतो. अर्थातच रुक्षता वाढते शरीर शक्ती कमी होते, थकवा निरुत्साही जाणवायला सुरुवात होते. आपल्या शरीरात हे बदल होतात म्हणून उन्हाळा सुरू झाल्यानंतर आपल्याला आपल्या खाण्यापिण्यात, वागण्यात, औषधात काही बदल करायला लागतात, की जेणेकरून वरील बदलामुळे अस्वस्थता निर्माण होणार नाही. रसधातूचे पोषण करण्यासाठी "रस" स्वरूपातील द्रव पदार्थाचे उन्हाळ्यात नियमित सेवन करावे. जसे की लिंबू शरबत, कोकम शरबत, शहाळेचे पाणी हे तर उत्तम आहेतच, पण शीत गुणधर्माच्या द्राक्षाचे सेवन अवश्य करावे गोड डाळिंबे मिळत असल्यास त्याचा रस खडीसाखरे बरोबर घ्यावा.

अतिरिक्त उन्हामुळे शरीर, मनाची लाही न व्हावी यासाठी निसर्गही एका बाजूने आपल्याला भरभरून देत असतो. कैरीचे पन्हे प्यायलास आपल्याला याची प्रचिती अवश्य येईल.

**उन्हाळ्यातील आहार :**

दूध, साजूक तूप, घरचे ताजे लोणी, याचा आहारात अवश्य समावेश करावा. उष्णतेमुळे वाढणारी वृक्षता कमी व्हावी व ताकद कायम राहावी यासाठी या सर्व गोष्टी उन्हाळ्यात वरदान होत. ओल्या नारळाचा वापर स्वयंपाकात अवश्य करावा. चींच ऐवजी कोकम, लिंबू वगैरे आंबट पदार्थ वापरावेत. जिरे, धने, हळद, कढीपत्ता, कोथिंबीर, दालचिनी, वेलची वगैरे मसाले वापरून रुचकर भाज्या बनवाव्यात.

दुपारच्या जेवणात ताजे ताक घ्यावे. खस अर्थात वाळा व चंदनाचे आयुर्वेदिक पद्धतीने तयार केलेले शरबतही उन्हाळ्यात उपयुक्त होय. एकंदर उन्हाळ्यात द्रव्य गोष्टीचा भरभरून वापर करावा चहा कॉफीची सवय असणाऱ्यांनी त्याचा पर्याय म्हणून आयुर्वेदिक हर्बल टी चा प्रयोग अवश्य करून पहावा. आयुर्वेदिक हर्बल टी बनवण्यासाठी पाव चमचा बडीशेप व पाव चमचा ज्येष्ठमधाचे चूर्ण व चवीनुसार अर्धा ते एक चमचा साखर घालावी उकळी आल्यावर झाकण ठेवून तीन-चार मिनिटे थांबावे व नंतर गाळून घेऊन चहा प्रमाणे साधारण गरम असताना प्यावे अशा हर्बल टी मुळे पचनशक्ती सुधारते व काहीतरी गरम प्याल्याचे समाधान मिळते आणि तरीही चहा कॉफी नंतर वाढणाऱ्या उष्णतेप्रमाणे उष्णता अजिबात वाढत नाही.

कधी कधी उन्हाळ्यात रात्री फारशी भूक लागत नाही अशावेळी मुगाची कडन प्यावे मूग विर्याणी थंड असून पचायला हलकी असतात पण ताकद कायम ठेवणारे ही असतात. **उन्हाळ्यातील आचरण :** सकाळी ऊन जणवायला सुरुवात व्हायच्या आधी किंवा संध्याकाळी सूर्यास्ताच्या वेळी अनवाणी पायाने दुर्वाच्या हिरवळीवर चालावे.

हातापायाची तळव्याची आग डोळे लाल होणे वगैरे तक्रारी जाणवत असल्यास आठवड्यातून दोन वेळा तळहात व तळपायांना तूप लावून कशाच्या वाटीने चोळावेत. झोपताना बंद पापण्यावर गुलाब पाण्यात भिजवलेल्या कापसाची घडी ठेवावी. झोपण्यापूर्वी नाकात साजूक तुपाचे दोन-तीन थेंब टाकावे. उन्हाळ्यात रुक्षता वाढत असल्याने आठवड्यातून किमान दोन-तीन वेळा अभंग करावे. अभ्यंगासाठी वापरलेले तेल धातू पोषक औषधांनी सिद्ध केलेले असल्यास थकवा नाहीसा व्हायला मोलाची मदत मिळते.

रशसे आणि वाढलेली वृक्षता यामुळे बहुदा उन्हाळ्यात त्वचा निस्तेज दिसू लागते. अशावेळी आयुर्वेदिक उदवर्तन अर्थात उटण्याचा चांगला उपयोग होतो. चंदन, वाळा, अनंतमूळ, ज्येष्ठमध वगैरे शीत व क्रांतीवर्धक वनस्पती पासून तयार केलेले चूर्ण दुधात मिसळून अंगाला लावावे.

उन्हाळ्यामध्ये शीतली, सित्कारी सारखे प्रणायम करावे हे प्राणायाम शरीरामध्ये शीतलता निर्माण करतात.

**उन्हाळ्यात वापरण्यात येणारे आयुर्वेदिक औषधे :**

उष्णता कमी करणारे गुलकंद. मोरावळा, चंदन, उशीर या शीत गुणात्मक औषधांचा वापर करावा.

अशाप्रकारे प्रकृतीनिरुप व उष्णता निवारक आहार, अतिरिक्त शक्तीक्षय होणार नाही या बेताने योजलेले आचरण व प्रकृती निरक्षित गुणधर्माच्या तसेच रस धातु पोषक औषधाच्या साह्याने उन्हाळ्यात सामोरे गेल्यास उन्हाचा त्रास होणार नाही.



**डॉ.अभिजीत भा. सावळे,**
**एम डी (आयुर्वेद), मो. 7588818505**
**श्री संत जगदीश हॉस्पिटल (वंध्यत्व निवारण व पंचकर्म केंद्र) छत्रपती संभाजीनगर**

श्री संत
जगदीश हॉस्पिटल
आयुर्वेद चिकित्सा व पंचकर्म केंद्र
डॉ.अभिजीत भा.सावळे
एम डी (आयुर्वेद)
७५८८८१८५०५
डॉ सुचिता अ.सावळे
बी ए एम एस
डी.वय. एन (पुणे)
८४८५८०३४९०
साई हेरिटेज,पहिला मजला,रिद्धी सिद्धी हॉल जवळ,खिवांसरा पार्क,औरंगाबाद

# वंध्यत्व व आयुर्वेद

21 व्या शतका वंध्यत्वाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे, ही वाढणारे प्रमाण चिंताजनक आहे. वंधत्वाच्या वाढणाऱ्या प्रमाणाला आधुनिक जीवनशैली आपले राहणीमान, सवयी, खाणेपिणे हे सुद्धा कारणीभूत आहे.

वंध्यत्व म्हणजेच मूल न होणे. आयुर्वेदा वंधत्व हा शब्द स्त्री व पुरुष या दोघांसाठी वापरलेला आहे. वंधत्वा म्हणजेच केवळ गर्भधारणा न होणे असे नसून गर्भधारणा झाली तरी पूर्ण नऊ महिने गर्भ गर्भाशयात टिकू शकत नाही व गर्भपात होतो त्यालही वंधत्वच म्हणतात.

शुक्रं धैर्यं च्यवन प्रीतीं देह बलं हर्ष बिजाथं च ।.... सुश्रुत सुत्रस्थान शुक्रात गर्भः प्रसादचः ॥.... चरक चिकित्सा स्थान या दोन सूत्रावरून गर्भधारणेसाठी शुक्रधातूची आवश्यकता असते हे लक्षात येते शुक्रधातूदोष उत्पन्न झाला तर त्याचा परिणाम वंधत्वावर होऊ शकतो.

आयुर्वेदा वंधत्वाची काही मुख्य कारणे याप्रमाणे सांगितले आहेत स्त्रीच्या बाबतीत गर्भाशय वगैरे यांना कोणत्याही प्रकारची रचनात्मक किंवा क्रियात्मक दोष विगुणीत असणे.

अंडाशयात बीज तयार न होणे किंवा त्याची वाढ नीट न होणे किंवा ती योग्य काळात बिचंडातून बाहेर न पडणे यास प्रामुख्याने हार्मोन्स मध्ये घडणारे बदल कारणीभूत असतात.

स्त्रीबीज अंड्यामध्ये दोष असणे.

पी.सी.ओ.डी. म्हणजेच पॉलिसी स्टिक ओरिएन डिसीज असणे यात अंडाशयात बीज बाहेर न पडता ते तिथेच राहून cyst तयार होतात व वंधत्व येते.

गर्भाशय याचे मुख दुर्बल असणे यात गर्भधारणा झाली तरी गर्भाचे वजन पेलून धरण्याची क्षमता गर्भाशयाच्या मुखात नसल्याने गर्भास्राव होतो.

योनी मार्गात इन्फेक्शन असणे.

गर्भाशयाला पडदा असेल किंवा अरबूत असेल.

बीज वाहून नेणारी बंद असेल तर ट्यूब मध्ये अवॉर्ड झाल्यामुळे स्त्री व पुरुष बीज एकत्र येऊ शकणार नाही म्हणून गर्भधारणा होत नाही.

थायरॉईडचा त्रास असणे.

वय -मासिक पाळी सुरू झाल्यापासून ती संपेपर्यंत स्त्री गर्भधारणा करू शकत असली तरी वयाच्या 35 वर्षानंतर होणारी गर्भधारणा त्रासदायक असते व बऱ्याच वेळा गर्भपाताची शक्यता असते.

स्त्री किंवा पुरुष कोणालाही अति मानसिक ताण असणे.

प्रकृतीनुरूप आहार न- ठेवल्यामुळे.

पुरुषांमधील वंधत्वाचे कारणे

शुक्राणू ची संख्या कमी असणे.

शुक्र बीजामध्ये काही दोष असणे.

आयुर्वेदानुसार दिनचर्या, ऋतुचर्या, व आहार विहारचे पालन केले तर खूप लवकर अंधत्वावर मात करून मातृत्व प्राप्त करू शकतो.

आयुर्वेदामध्ये वंधत्वावर मात करण्यासाठी शमन व शोधन चिकित्सा वर्णन केलेली आहे



स्त्री वंधत्व चिकित्सा

शोधन चिकित्सा

पंचकर्म मधील वमन, विरेचन, बस्ती, नस्य इत्यादीने खूपच चांगले फायदे होतात. या क्रियेत शरीर शुद्ध होते त्यामुळे तयार होणारे हार्मोन्स व्यवस्थित तयार होतात.

आयुर्वेदातील उत्तर बस्ती ही वंधत्वासाठी वरदान आहे. उत्तर बस्ती यात गर्भाशय मार्गाने औषधी आत सोडली जातात त्यांनी गर्भाशयाचे आतून शोधन होते व नंतर गर्भाशयाला बल देणारी औषधी दिली जातात त्यामुळे गर्भधारणा लवकर होण्यास मदत होते.

पी.सी.ओ.डी. रुग्णांना पंचकर्म उत्तर बस्तीचा विशेष उपयोग होतो. वारंवार गर्भपात होणाऱ्यांनी प्रथम पंचकर्म करून शरीरशुद्धी करून घ्यावी व नंतर गर्भधारणे प्रयत्न करावे.

शमन चिकित्सा गर्भाशयाला बल देणारी औषधी वापरून गर्भाशय गर्भधारणे योग्य बनवले जाते.

विष तयार करण्यासाठी व त्याची योग्य वाढ होण्यासाठी औषधे दिली जातात.

सर्व शरीर धातूंना बल देणारी ब्रह्मण चिकित्सा करतात.

गर्भाशय बल्ले सारखे अनेक गुणवंत औषधी वापरून स्त्रीच्या सर्व धातू व गर्भाशयाला बल दिले जाते व त्यामुळे गर्भधारणा होऊन होणारी संतती आरोग्यवान असते.

पुरुष वंधत्व चिकित्सा

पुरुषामध्ये काही शुक्र दोष असेल तर त्यामध्ये सुद्धा उत्तर बस्ती करतात.

पुरुषामध्ये शुक्राणू ची संख्या कमी असेल तर शुक्राण वाढण्यासाठी बल्या औषधी देतात.

या आयुर्वेदातील शोधन व शमन चिकित्सेने वंधत्वावर मात करू शकतो.



- डॉ. सुचिता अ. सावळे
बी.ए.एम.एस.,डी.वाय. एन.,एम.ए.(योगा)
Infertility, prenatal yoga and Garbhsanskar Consultant

# आंबेडकरवादी चळवळ स्वार्थामुळे मागे



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**आंबेडकरवादी चळवळ म्हणजे मानव जातीचे कल्याण करून देशाला सक्षम बनवणारी एकमेव चळवळ होय. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आत्मसात करून जन सामान्य माणसाच्या मना मनामध्ये रुजवले गेले, तर जातीवाद, विषमता, हेवेदावे, धर्म, पंथ सर्व गोष्टी बाजूला सारून माणसाच्या मनामध्ये मानव कल्याण व देश कल्याण याचाच विचार येऊ शकतो. परंतु आंबेडकरवादी चळवळ लोकांच्या मनामध्ये किंवा देशांमध्ये फार मोठ्या प्रमाणात एकत्रित व संघटित कार्य करू शकत नाही. त्याचे सर्वात महत्त्वाचे कारण आंबेडकरवादी चळवळीमध्ये लोकांनी बघितलेला स्वार्थ कोणत्याही चांगल्या कामाला, किंवा चांगल्या व्यक्तीला, चांगल्या विचाराला, शत्रूची आवश्यकता असते.**

तो शत्रू चांगले काम, चांगला व्यक्ती, तेव्हा चांगल्या वेळेस विचाराला विरोध करून, त्या विरोधी काम, मनुष्य व विचार कसे चांगले आहेत, हे नेहमी सांगण्याचा प्रयत्न करत असतो. परंतु आंबेडकरवादी सामाजिक चळवळी मध्ये परिस्थिती उलटी आहे. आंबेडकरवादी सामाजिक चळवळीला शत्रू कडून कोणत्याही प्रकारची भीती किंवा धोका नाही. तरी आंबेडकरवादी चळवळ अपयशी का ठरते? किंवा मागे का राहते? याचे महत्त्वाचे कारण सामाजिक चळवळीमध्ये राजकीय व आर्थिक स्वार्थ बघून, स्वतःलाच स्वतः नेता म्हणून घोषित करणे. सामाजिक चळवळीचा उपयोग राजकीय व्यवस्थेसोबत करून, आणि राजकीय व्यवस्थेमधून, स्वार्थ साधण्यासाठी सामाजिक चळवळीचा वापर होतो. आपल्या मनात येईल त्या पद्धतीने काम करत आहे. पद, प्रतिष्ठा व पैसा या गोष्टी जर मिळत असतील तर इमान, स्वाभिमान आणि बुद्धी ह्या गोष्टी गहाण टाकून आंबेडकरवादी लोकांचे विघटन करून, आंबेडकरवादी चळवळीची ताकद कमी करण्याचे काम स्वार्थी व लाचार लोकांकडून होत आहे. नेतृत्वासाठी हापापलेल्या व मीच करतो ते योग्य बाकीच्यांना चळवळ व बाबासाहेब कळाले नाही. बाकीच्यांमध्ये ती लायकी नाही असे वक्तव्य करून, किंवा मत मांडून आपण स्वतःच बाबासाहेबांचे विचार स्वीकारण्याच्या व आंबेडकरवादी चळवळ चालवण्याच्या लायक नाही, हे सिद्ध करून देतात. आंबेडकरवादी चळवळ शिक्षण संघटन आणि संघर्ष या गोष्टी सांगते. परंतु जे स्वतःला बाबासाहेबांचे किंवा आंबेडकरवादी चळवळीचे वैचारिक



वारसदार समजतात किंवा आम्ही सांगतो तीच चळवळ तेच विचार सत्य आहेत, किंवा स्वतःचे विचार इतरांवर लादण्याचा प्रयत्न करून, मीच कसा श्रेष्ठ आहे, मीच किती मोठे काम केले. हे सांगून समाजामध्ये स्वतःचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी प्रयत्न करून, आपले समर्थक मिळवण्याचा यांचा हा प्रयत्न असतो. परंतु कोणतीही पद प्रतिष्ठान पैसा व राजकीय पक्षांची तडजोड न करता, मी केवळ बाबासाहेबांचा अनुयायी आहे, आंबेडकरवादी चळवळीची जाणीव आहे, या भूमिकेतून कोणीही समोर येऊन काम करण्याचा प्रयत्न करत नाही. काही लोक मी आज भूमिकेतून समोर येऊन काम करण्याचा प्रयत्न करतात, तर पद, प्रतिष्ठा, पैसा या स्वार्थापोटी स्वतःला नेते समजणारे लोक काम करणाऱ्या लोकांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष विरोध करतात. किंवा त्यांच्या कामामध्ये अडचण निर्माण करून ते काम पूर्णत्वास जाणार नाही यासाठी प्रयत्न करतात. आणि एखादे काम जर समोर जात नसेल वैचारिक कामांमध्ये अडचण येत असेल तर बऱ्याच लोकांना त्याचे समाधान मिळते व स्वतःची पाठ स्वतःच्या हाताने थोपटून स्वतःलाही आंबेडकरवादी चळवळीची कार्यकर्ते समजतात. तर हे अविचारी व मूर्खपणाचे लक्षण होय. आंबेडकरवादी चळवळ म्हणजे प्रत्येकाचा स्वाभिमान,इमान जागृत ठेवून सर्वांच्या विकासाचे काम करत असते. स्वतःला आंबेडकरवादी समजणारे लोक व चळवळ मीच चालवतो असे म्हणणारे लोक जर एकत्र येत नसतील, प्रत्येक वेळेस दुसऱ्याचे दोष बघत असतील, आणि स्वतःच स्वतःला वैचारिक सामाजिक नेता समजत असतील, तर ते कधीही संघर्ष करू शकत नाही. आणि संघर्षाचे नाटकही केले तर ते समाजासाठी नसून स्वार्थासाठी असेल. ज्यांना सामाजिक समस्या पेक्षा स्वतःचे पद प्रतिष्ठा व पैसा महत्वाचे वाटत असतो ते लोक कधीही आंबेडकरवादी चळवळ समोर नेऊ शकत नाहीत. किंवा ते चळवळीचे आदर्श कार्यकर्ते सुद्धा राहू शकत नाहीत. पद, प्रतिष्ठान, पैसा व इतरांबद्दल असलेली नकारात्मकता या गोष्टीमुळेच आंबेडकरवादी चळवळ वेगवेगळ्या गटात विभागली गेली. विभागल्या गेलेल्या लोकांनी सामाजिक कार्य सोडून, स्वतःची दुकानदारी अबाधित कशी राहील यावर लक्ष केंद्रित केले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर राज्य व राष्ट्रीय पातळीवरती आंबेडकरवादी चळवळ जोमाने काम करू शकत नसली, तरीही स्वार्थी, लोभी व तडजोड करणाऱ्या लोकांमुळे देशभरात मात्र आंबेडकरवादी चळवळीचे तुकडे तुकडे होऊन आंबेडकरवादी चळवळ मागे खेचण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. आपण एकंदरीत विचार केला तर आंबेडकरवादी चळवळ मागे ओढण्यासाठी शत्रू लोकांनी, आंबेडकरवादी विचाराच्या विरुद्ध लोकांनी ती मागे आणली नाही, तर स्वतःला आंबेडकरवादी समजणाऱ्या लोकांनीच तिचे तुकडे तुकडे करून तिचा वेग कमी केलेला आहे. बाबासाहेबांना अपेक्षित सर्व व्यापक चळवळ उभी करायची असेल, तर पद, प्रतिष्ठा पैसा, या गोष्टी बाजूला सारून शिक्षण, संघटन व सामूहिक संघर्ष जर केला तरच, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत आंबेडकरवादी चळवळ संपूर्ण भारतभर पसरून, संपूर्ण मानव जातीला हक्क, अधिकाऱ्यासोबतच आदर्श व समृद्ध जीवन जगण्यासाठी मदत होईल. आंबेडकरवादी चळवळ वेगवान करायचे असेल तर, हेवेदावे पद प्रतिष्ठान वैयक्तिक मतभेद बाजूला ठेवून नेतृत्वाचा कोणताही विचार न करता फक्त चळवळीचा कार्यकर्ता म्हणून जर काम केले तर आंबेडकरवादी बहुसंख्य लोक, आंबेडकरवादी चळवळीचा नेता ठरवतील स्वतःचा नेता ठरवून चळवळीचे तुकडे करण्यात कोणत्याही प्रकारचा शहाणपणा नाही. म्हणून सर्वांनी पद, प्रतिष्ठा सार्थ बाजूला करून, केवळ आंबेडकरवादी चळवळ समोर नेण्यासाठी एकत्र येऊन चळवळीला वेग व दिशा द्यावी. तरच स्वतःला आंबेडकरवादी म्हणून घेताना स्वाभिमानाने मान उंचावेल.

# पुस्तके वाचण्यात हयगय का करता ?



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिन दरवर्षी २३ एप्रिल रोजी साजरा केला जातो. वर्ल्ड बुक कॅपिटल २०२० मलेशियाची राजधानी असलेले क्वालालंपूर आहे. युनेस्को आणि त्यासंबंधित संस्था जगभरात जागतिक पुस्तक दिन साजरा करतात. लोकांमध्ये वाचनाची सवय वाढवणे, जगभरातील लेखक आणि पुस्तकांचा सन्मान करणे हे या दिवसाचे मुख्य उद्दीष्ट आहे. _याचा उहापोह अलककार- श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी यांनी या लेखातून प्रभावी शब्दशैलीत मांडला...**

आधुनिक केसरी

विश्व पुस्तक दिवस हा २३ एप्रिललाच का साजरा करावा? तर विल्यम शेक्सपियर, मिगुएल सर्व्हेंटिस व इंका गार्सिलोसो यांच्यासह जगातील ख्यातनाम व्यक्तींचा या दिवशी मृत्यू झाला आहे. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी युनेस्कोने हाच दिवस विश्व पुस्तक दिन म्हणून घोषित केले. हा दिवस पहिल्यांदा २३ एप्रिल १९२३ रोजी स्पेनमधील पुस्तक विक्रेत्यांनी साजरा केला. तर स्पेनमध्ये मिगेल डे सर्व्हांटिसच्या स्मरणार्थ तो साजरा केला होता. त्यानंतर सन १९९५मध्ये पॅरिसमध्ये युनेस्कोची सर्वसाधारण सभा झाली होती. त्यात जगभरातील लेखकांघा आदर करणे, त्यांना श्रद्धांजली वाहणे आणि पुस्तकांमध्ये रस निर्माण करणे या हेतूने जागतिक पुस्तक दिन प्रत्येक वर्षी साजरा केला जाईल असा निर्णय घेतला गेला. आता कॉपीराइट म्हणजे काय? तर कॉपीराइट ही एक कायदेशीर संज्ञा आहे. एखाद्या रचनेचा मूळ लेखक किंवा निर्मात्याचे त्या रचनेवर मर्यादित काळासाठी विशिष्ट हक्क असतात. ज्या कंपनीस किंवा ज्यास तो ते वापरण्याचे अधिकार देतो, ती व्यक्ती ही रचना व्यावसायिक किंवा इतर कारणांसाठी वापरू शकते. कधीकधी निर्माता प्रकाशन संस्थेशी करार करतो. नंतर कॉपीराइटचा अधिकार एका विशिष्ट प्रकाशनाकडे जातो. त्या प्रकाशनाव्यतिरिक्त अन्य कोणी ती रचना वा साहित्य वापरू शकत नाही. जर कोणी याचे उल्लंघन केले तर त्याच्याविरूद्ध कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते. ज्ञान देण्याबरोबरच पुस्तकांमध्ये मनोरंजन करण्याची अद्वितीय क्षमता आहे. पुस्तके आपल्याला ज्ञान देतात, यात शंकाच नाही, परंतु पुस्तकांमध्ये बऱ्याच मनोरंजक गोष्टी देखील वाचायला मिळतात. ती आपले मनोरंजन देखील करतात. आपली भाषा देखील पुस्तकाद्वारे सुधारते. एखाद्या चांगल्या मित्र-मैत्रिणीहून कल्याणकारी सल्ला देणारा तो जिगरी दोस्त आहे. क्रांती, शांती, दया, माया, अशा दैवीगुणांचा परिपाक त्यांच्या वाचनातून साधता येतो. शिक्षणसम्राट महात्मा फुले, ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले व फातिमाबी शेख, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना पुस्तक वाचूनच समाज सुधारण्याची उर्मी व प्रेरणा प्राप्त झाली. वडीलधाऱ्या मंडळींनी पैला पै जोडून मोठाले ग्रंथ, पुस्तके घरी कोनाड्यात जपून ठेवली आहेत. ती तशीच बासनात गुंडाळलेल्या अवस्थेत धूळ खात पडून आहेत. मात्र सुपुत्र-सुकन्यांची ते उघडून बघण्याची तर जाऊ द्या, साधी त्यावरची धूळ झटकण्याची बिशाद होत नाही. आज इतका उच्चविद्याविभूषित माणूस पुस्तकांचा द्वेष करतो की काय? म्हणे,



"आज सर्व मोबाईल व इंटरनेटवर सर्व काही वाचण्यास मिळतो, मग पुस्तकांची काय गरज?" अरे, हो! अगदी खरे. पण तू ते गुगल- इंटरनेट यांवर सर्च करून खरेच मिचमिचत्या नेत्रांनी किंवा डोळे फाडफाडून खरेच वाचतोच? नाही, नुसत्याच काहीच्या बाही टिवल्या-बावल्या पाहतोस; खरेय ना हे? वाचनाशी माणसाची मैत्री असावी. मोठ्या रस्त्याने दुतर्फा लावलेली झाडे पांथस्थास जशी सावली देतात व सुखाच्या प्रवासात सोबतीने भागीदारी करतात, तसे मानवी जीवनप्रवासात पुस्तके ही जीवनप्रवास समृद्ध करतात. सर्जनशीलतेचा महामार्ग पुस्तकांच्या पानापानांतूनच जातो.

आपल्या मराठी भाषेतही विपुल साहित्यसंपदा उपलब्ध आहे. वि.स. खांडेकर, वि.वा. शिरवाडकरांपासून आजपर्यंतच्या भालचंद्र नेमाडे यांच्यापर्यंत. तर रवींद्रनाथ टागोरांपासून गुलजार साहेबांपर्यंत. कन्नड भाषेतही दिग्गज लेखक आहेत. शिवराम कारंथांसारख्या लेखकाची पुस्तके अनेक भाषांत भाषांतरीत झाली आहेत. गुणी जणांनी एवढा आटापिटा का केला असेल?

हा दिवस जगातील वेगवेगळ्या देशांमध्ये विविध पद्धतींनी साजरा केला जातो. काहीजण पुस्तके विनामूल्य वितरित करतात, तर कुठे स्पर्धा आयोजित केली जाते. स्पेनमध्ये दोन दिवस रीडिंग मॅरेथॉनचं आयोजन केलं जाते. या मॅरेथॉनअखेरीस एका लेखकाला प्रतिष्ठित मिगेल डे सर्व्हांटिस पुरस्कार दिला जाते. स्वीडनमधील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये लेखन स्पर्धा घेतल्या जातात. २३ एप्रिल दिवस जगातील वेगवेगळ्या देशांमध्ये विविध पद्धतींनी साजरा केला जातो. काहीजण पुस्तके विनामूल्य वितरित करतात, तर कुठे स्पर्धा आयोजित केली जाते. स्पेनमध्ये दोन दिवस रीडिंग मॅरेथॉनचं आयोजन केले जाते. या मॅरेथॉनअखेरीस एका लेखकाला प्रतिष्ठित मिगेल डे सर्व्हांटिस पुरस्कार दिला जाते. स्वीडनमधील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये लेखन स्पर्धा घेतल्या जातात. शेक्सपिअर यांचा जन्म व योगायोगाने मृत्यूदिनही तीच तारीख तर जन्मगाव व मृत्यूगावही एकच होते. असा योग त्यांच्या बाबतीत घडून आला. शेक्सपिअरच्या शरीरधर्माला भूतलावर अवघे पन्नाशीचे आयुष्यमान लाभले पण लेखनाने निर्माण केलेले कीर्तीमान अमर ठरले आहे. लेखन क्षेत्रात सर्वोच्च कीर्ती-प्रसिद्धी व सर्वोच्च श्रीमंती-आर्थिक सुबत्ता लाभलेला बहुधा हा एकमेव माणूस असावा. ३८ नाटके व १५४ कविता ही त्यांची लेखन संपदा होय. एकूण नाटकांपैकी १० ऐतिहासिक, १६ सुखात्मक व १२ शोकात्मक आहेत. शेक्सपिअरच्या साहित्य संसदेचे वैशिष्ट्य म्हणजे जगात ज्ञात असलेल्या सर्वच भाषांत त्यांची पुस्तके अनुवादित झालेली आहेत. माणूस वाचून वाचून मनातील काहीतर लिहावयास लागावा, म्हणून एका कविमहोदयाने नकलून ठेवले-

**"लिहिणाराने लिहीत जावे,**
**वाचणाराने वाचत जावे!**
**कधीतरी वाचणाराने,**
**लिहिणाराचे शब्दच घ्यावे!!"**

इतके सुंदर प्रभावी आहे हे पुस्तक व ग्रंथ वाचणे. वाचनाने आपली भाषा, विचार समृद्ध होत जातात. "माझ्याकडे इतकी संपत्ती, इतका जमीनजुमला आहे." असल्या फालतू अहंवर्धक गोष्टी पुस्तक वाचल्याने पार भस्म होऊन जातात. विचारांची ही श्रीमंती तुमच्यापासून कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. वाचनाने विचार आणि वाचा यात प्रगल्भता येते. म्हणून वाचाल तर वाचाल आणि समृद्धपणे जगाल, एवमेव मात्र खरे!


# गोरा कुंभार



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आधुनिक केसरी

श्री पावन क्षेत्रातील म्हणजेच पंढरपूरच्या विठ्ठलाचा परमभक्त अशा या संत श्रेष्ठाचा जन्म मराठवाड्यातील तेरढोकीचा आहे. ज्ञानेश्वराच्या संतमंडळींच्या गोतावळ्यात गोरोबाकाका म्हणू या हे काका वयाने व ज्ञानाने श्रेष्ठ आहेत. भक्ति व कर्म या दोन्हींचा सांगड घालताना भजनानंदात ब्रम्हानंदी टाळी लागली आहे पण पोटापाण्यासाठी मडकी बनवणे व ती विकणे हा झाला त्यांचा कर्मयोग पण या अवलीया भक्ताची कर्मकहाणी वाचताना अक्षरशः अंगावर शहारे आल्याशिवाय रहात नाही. एकदा काय झाले मडकी घडवण्यासाठी माती पायाने रगडत होते.माती तुडवत असताना स्वतः चं रांगत पोर पायाखाली चिरडलं गेलं तरी त्यांना समजलं नाही. अशी ही गोरोबाकाका काकांची हरीभक्ति संतमंडळींच्या जीवनाचा विचार केला की असं लक्षात येत की त्यांच्या जीवनात वैराग्य ठासुन भरलेलं असतं पण मनुष्य जन्म तर आला आहे. म्हणजेच भक्ति व वैराग्य यांचा समन्वय साधण्याचं काम त्यांना करावं लागत आहे. वेदातांच्या अनुभव खुणा त्यांच्या अभंगातून पहायला मिळतात. आपल्या संस्कृतीत माठ किंवा आपण त्याला "घट" म्हणतो तो मांगल्याचं प्रतिक आहे. हे कलशः त्यांच्या हातून घडवले गेले. भागवत धर्माचे मांगल्याचं काम घट बनववून जगाला मांगल्याचा रस्ता भागवत धर्मातून जगाला दाखवला. "विठ्ठलाचे नाम स्मरे सर्व काळ ।नेत्री वाहे जल सदोदित । कुल्लाळाचे वंशी जन्मले शरीर तो गोराकुंभार हरिभक्त ।। शके 1239 च्या चैत्र महिन्यात त्रयोदशीला गोरोबाकाकांनी समाधी घेतली. अशा या हरिभक्ताच्या चरणीं विनम्रपणे नमस्कार.



# व्यापक जनहितासाठी काटेकोर आयुष्य जगलेले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर!

संयमाचा परीघ





चित्र : बाबूराव पाटील, भोकर

प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : २४

**आपण भारतीय माणसं बाबासाहेबांची जयंती १४ एप्रिल पासून ३१ एप्रिल पर्यंत साजरी करतो. गावो गावी मिरवणुकींसह विविध उपक्रमांची रेलचेल असते. समाजमन ढवळून निघतं. विकासाच्या वाटा सुचकात. प्रश्नांची उकल होते. वार्षिक आवघडलेपण निघून जातं.संवादाचे सूर सापडतात. साठलेलं, साचलेलं मांडता येतं. विचारांसह माणसं निसून घेतात. समाजाला हवं नको ते बघता येतं.गावी गणगोतात जाता येतं चार दोन दिवसांच्या सुट्ट्या काढून. भावकीत रमता येतं. भावाबंधांचे रुसवे-फुगवे फुस्स होतात. माणसाजवळ माणूस येतं. ठरवून काही छान करता येतं. बाबासाहेबांची जयंती ही अशी समाज सुधारणेसाठी, मनाचं जरा वैचारिक भरण पोषण करण्यासाठी वृत्तपत्रांमधून चार ओळी लिहिता येतात, दर्जेदार व्याख्याणांचं, वैचारिक कविसंमेलनांचं आयोजन करता येतं.**

आधुनिक केसरी

विविध स्पर्धांमधून बाबासाहेब वाचायला देता येवू शकतात लेकरांना आणि माय बहिनींना मोकळा श्वास घेता येता चार पावलं घराबाहेर पडून जयंतीच्या निमित्तानं.बाबासाहेब या आपल्या जीवनाचा उद्धार करणा-या महापुरुषाची केवळ प्रतिमाच नव्हे तर प्रतिभाही जगासमोर मांडता येते आणि आपल्या जगण्यातल्या उनिवांचे उच्चाटन करता येते.आजच्या या सदर लेखणाचा उद्देशही वंदनीय भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचं सर्वस्पर्षी, व्यापक जनहीताची कास धरणारं, आपल्या यातनांचं समूळ उच्चाटन व्हावं यासाठी बाबासाहेबांनी जी जोखीम उचलली, जो रोष पत्करला, जी जीवनमूल्ये स्विकारली, जो त्याग केला त्याचा थोडक्यात परीचय तरी व्हावा.बाबासाहेब ही व्यापक जनहितकारी जीवनधारा आहे आणि त्या जीवनधारेचा स्पर्ष जरी झाला तरी आपलं जगणं उजळून निघू शकेल. बाबासाहेब जसं जगले त्याच्या किमान १० टक्के जरी आज आपल्याला जगता आलं तरी आपलं जगणं सार्थकी लागेल सज्जनहो ! ) अशक्य वाटावं असं कांही आयुष्य एक माणुस जगला यावर विश्वास बसणं आवघड आहे.म्हणजे असं बघा... जन्म १४ एप्रिल १८९१ चा. बौद्ध धम्माची दिक्षा घेतली १४ ऑक्टोबर १९५६ ला. मृत्यू ०६ डिसेंबर १९५६ चा म्हणजे धम्म दिक्षा घेतल्यानंतर केवळ ५० दिवसांनी.

बाबासाहेबांना आयुष्य लाभलं केवळ ६४ वर्षाचं. काय केलं या अल्पशा आयुष्यात बाबासाहेबांनी ? बाबासाहेबांचा जन्म मध्यप्रदेशातील इंदौर जवळ असलेल्या महू गावात. वडील रामजी मालोजी सपकाळ आणि आई भीमाबाई. रामजी भारतीय सेनेमधे सुभेदार होते. बाबासाहेबांचं मूळ गाव कोकणातील अंबवडे बाबासाहेबांचं मूळ आडनाव सपकाळ अंबावडे हे रत्नागिरी जिल्ह्यातील मूळ गाव, या गावातील शाळेत नाव घालताना आंबेडकर गुरुजींनी बाबासाहेबांचे नाव हजेरीपटावर अंबावडेकर असं गावावरुन नाव टाकताना अवघड वाटल्यामुळं स्वतःचं आंबेडकर असं नाव नमूद केलं आणि तेंव्हापासून सपकाळ नंतर अंबावडेकर आणि शेवटी आंबेडकर असं नाव झालं. शाळेत घातल्या नंतरचे २५ वर्षे बाबासाहेब सारखे शिकत होते : लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अ्यांड पोलिटिकल सांयस येथून 'बार-ॲट लॉ' ही शेवटची शैक्षणिक पदवी १९१८ ते १९२१ च्या दरम्यान रात्रंदिवस आभ्यास करुन प्राप्त केली. म्हणजे बाबासाहेबांचा आरंभीचा ३० वर्षाचा काळ कठोर शैक्षणीक मेहनतीत अर्थात तपश्चर्येतच गेला असे म्हणावे लागेल.ही बाबासाहेबांनी २५ वर्षे एका विशिष्ट ध्येयानं झपाटून केलेली आयुष्याची सखाल पायाभरणी त्यांनी नंतर समाज उभारणीसाठी सत्कारणी लावली हे ही सुद्न्य वाचकांच्या लक्षात येईल.

१९०४ ते १९०७ च्या दरम्यान एल्फिन्स्टन विद्यालयात हायस्कुलमधे शिक्षण घेतलं. तत्पुर्वी रत्नागीरीतील 'अंबावडे' या आपल्या मूळ गावी बाबासाहेबांचं प्राथमिक शिक्षण झालं.१९०८ ते १९१२ या दरम्यान त्यांनी मुंबई विद्यापिठात आपलं पदवीचं शिक्षण घेतलं.त्यानंतर १०१३ ते १९१५ च्या दरम्यान कोलंबिया विद्यापीठ, १९१६ ते १९२१ दरम्यान युनिवर्सिटी ऑफ लंडन येथे, पुन्हा १९२३ ला युनिवर्सिटी ऑफ लंडन येथेच शिक्षण घेतले.१९२७ ला कोलंबिया विद्यापिठातून बाबासाहेब बॅरीस्टर होवून भारतात परतले. आणि तमाम यातनांचं आणि समग्र दुःखीतांचं प्रतिनिधित्व केलं. हे १९१३ ते १९२७ पर्यंतच्या बाबासाहेबांच्या परदेशातील शिक्षणासाठीचा प्रवास मोठा खडतर राहिला आहे.आणि तमाम यातनांचं आणि समग्र दुःखीतांचं प्रतिनिधित्व केलं.

ज्ञानाची तहानच त्यांना आपल्या देशाच्या घटना समितीतील मसुदा समितीच्या अध्यक्ष पदापर्यंत घेऊन गेली जिथं जगातल्या सर्व राज्यघटनांचा त्यांनी आभ्यास केला आणि आपली परीस्थिती काय आहे, आपला इतिहास काय आहे, आपला वर्तमान कशाने ग्रासला आहे आणि उद्या आपलं काय असायला हवं अशा सगळ्या गोष्टींचा आभ्यास करुन घटणा परीपुर्तीस नेली जी आजही आपल्या देशात कार्यान्वीत आहे. बाबासाहेबांच्या एकुण शैक्षणिक कार्यकाळात रत्नागीरीकडील अंबावडे गुरुजी, बाबासाहेबांचे वडील सुभेदार रामजीबाबा, बडोद्याचे सयाजीराव गायकवाड महाराज, राजे शाहू महाराज यांचे मौलिक यौगदान विसरण्यासारखे निश्चित नाही.

वयाच्या ३० नंतरच्या ३६ वर्षात अखंड लढे, आंदोलने आणि विविध स्वरुपाची समाजसेवा :

१९२१ नंतरचं संपुर्ण आयुष्य त्यांनी जवळ जवळ ३६ वर्षे समाजसेवेसाठी वाहून घेतलं.


या ३६ वर्षात बाबासाहेबांनी काय काय केलं बघा... सामाजीक लढे उभे केले.रस्त्यावर उतरुन आंदोलनं केली. २० जुलै १९२४ रोजी 'बहिष्कृत हितकारीणी सभा' स्थापण करुन वंचीत समाजघटकांचं हीत पाहिलं. १९ मार्च १९२७ रोजी 'समता सैनिक दल' स्थापण करुन समाजाच्या सुरक्षेची हमी दिली. २९ जुलै १९४४ रोजी 'द बॉंबे सेड्युल्ड कास्ट्स इंप्रुमेंट ट्रस्ट'ची स्थापणा करुन मागासवर्गीय जातीतील माणसांच्या जगण्यात प्रगतीदर्शक बदल व्हावा म्हणून संघटनात्मक प्रयत्न केले.

आपल्या समाज उत्थानाच्या चळवळीची भूमीका जनतेपर्यंत जशीच्या तशी जावी यासाठी चळवळीचं आयुध म्हणून वृत्तपत्रे काढली. मूकनायक( १९२० ), बहिष्कृत भारत( १९२७ ), समता( १९२८ ), जनता( १९३० ), प्रबुद्ध भारत( १९५६ ), कालमान आणि चळवळीची गरज लक्षात घेता या वृत्तपत्रांची अनिवार्यता सुज्ञ वाचकांच्या लक्षात यावी.

बाबासाहेबांनी सक्रीय राजकारणातही आवश्यतेनुसार सक्रीय सहभाग घेतला. शिकलेल्या माणसांचं राजकारणाशी काय संबंध म्हणून पलायनवाद स्विकारणा-या बांधवांनी ही गोष्ट लक्षात घेणं गरजेचीच गोष्ट आहे.आज समाजात उपटसुंभ्यांचं जे कांही दळभद्र राजकारण आपण पहात आहोत, ते सुज्ञ माणसांच्या राजकारणापासून दुर रहाण्याचा चमडीबचाव धोरणाचा दुष्परीनाम आहे.

बाबासाहेबांनी सक्रीय राजकारणात भाग घेताना आपल्या विकासाला आपणच कटीबद्ध रहायला हवं या भूमीकेतून राजकीय पक्ष स्थापण केला. १५ ऑगस्ट १९३६ ला 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापण करुन मजुरांची एकजूट केली.१९ जुलै १९४२ ला 'सेड्युल्ड कास्ट फेडरेशन'ची स्थापणा करुन तमाम अनुसुचीत जातींना राजकीय गतीविधींमध्ये सक्रीय सहभागासाठी प्रेरीत केलं.आणि बाबासाहेबांच्या नंतर बाबासाहेबांच्या स्वप्नातला 'रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया' या पक्षाची स्थापना ३ ऑक्टोबर १९५७ ला झाली.या पक्षाची स्थापणा करण्यापुर्वी बाबासाहेबांना 'सेड्यल्ड कास्ट फेडरेशन'बरखास्त करुन 'भारतीय रिपब्लिकन पक्ष' स्थापण करण्याची घोषणा १९५६ मधे केली होती परंती तत्पुर्वीच ६ डिसेंबर १९५६ ला बाबासाहेबांनी जगाचा निरोप घेतला.आपल्या पक्षाची ध्येय, धोरण, कार्यपद्धती आणि प्रत्यक्ष कार्य पहायला बाबासाहेब राहिले नाहीत, ही मोठी खंत राहिली.

देशा-परदेशातील सर्व धर्मांचा सखोल आभ्सास करुन परखड चिकित्सा करणारी पुस्तकं लिहिली. येवले परिषदेत जाहिर केल्यानुसार बाबासाहेबांनी १९५६ ला मोठ्या जनसमुदायासह नागपूर मक्कामी बौद्ध धम्माचा स्विकार करुन हिन्दू धर्मातील रुढी परंपरा आणि कुचंबनेपासून एका मोठ्या मानवी समुदायाची दैन्य आणि दास्यातून मुक्तता केली.हे करत असताना 'बुद्ध आणि त्याचा धम्म' हा आचरण ग्रंथ द्यायला बाबासाहेब विसरले नाहीत, हे विषेश.



**बाबासाहेबांनी काढलेल्या शिक्षण संस्था :**

'एवढे सगळे अनर्थ एका अविद्येने केले' असं महात्मा फुले म्हणाले आणि शिक्षणासाठी मुलींची पहिली शाळा पुणे येथील भिडे वाड्यात सुरु केली ज्याची सुरुवात सावित्रीमाईंना सुशिक्षीत करुन शिक्षिका करण्यापासून झाली.

बाबासाहेबांच्या कणवाळू अंतःकरणाने १४ जून १९२८ रोजी 'डिर्पेस्ट क्लासेस इज्युकेशन सोसायटी'ची स्थापना करुन दबल्या पिचल्या समाजाच्या शिक्षणाची व्यवस्था केली. तेंव्हा बाबासाहेब अवघ्या ३७ वर्षाचे होते.तत्कालीन मुंबई सरकारने बाबासाहेबांच्या या संस्थेला पनवेल, ठाणे,नाशिक,पुणे आणि धारवड येथे दबल्या पिचल्या अर्थात डिप्रेस्ड क्लासमधील विद्यार्थ्यांच्या शालेय शिक्षणाची सोय व्हावी म्हणून पाच वसतीगृहे सुरु करण्यास मान्यता दिली.

८ जुलै १९४५ रोजी पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापणा करुन शाळा महाविद्यालये सुरु केली आणि गोरगरीब समाजाच्या शालेय आणि उच्च शिक्षणाची सोय केली. पिपल्स एज्युकेशन संस्थेमार्फत १९४६ मध्ये 'सिद्धार्थ कला व वाणिज्य महाविद्यालय', १९५३ मध्ये 'सिद्धार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महीविद्यालय' आणि १९५६ मध्ये सिद्धार्थ विधी महाविद्यालय असे तीन महाविद्यालये मुंबईमध्ये काढले आणि १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलींद महाविद्यालयाची स्थापना केली.

शिक्षणाशिवाय आपल्या विकासाला कसलाच मार्ग नाही हे बाबासाहेबांनी कधीच ओळखले होते आणि स्वतःही झपाटल्यासारखे शिकून आपला गोरगरीब गळाटलेला समाज शहाणा करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले.ही बाबासाहेबांची प्रयत्नांची पराकाष्ठा पाहिली की थक्क व्हायला होतं.

**बाबासाहेबांनी काढलेली पाच वृत्तपत्रे :**

समाज परिवर्तनाचं साधन म्हणून बाबासाहेबांनी 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'समता', 'जनता', 'प्रबुद्ध भारत' ही पाच वृत्तपत्रे चालवली. समाजाशी लिखीत स्वरुपाचा संवाद साधला, आपली भूमीका तळागाळातल्या समाजापर्यंत पोंचवली.आपल्या चळवळीचे कार्यक्रम, समाजाचा आक्रोष, धार्मिक आणि सामाजिक व्यवस्थेचा अत्याचार रोखणारी विचारधारा, गुलामगिरी नाकारणारं स्फुलींग जनतेपर्यंत पोंचवलं आणि समाज शहाना केला.

बाबासाहेबांनी धर्मांतराचा इशारा देऊन तब्बल **२० वर्षे वाट पाहिली :** दि. १३ ऑक्टोबर १९३५ रोजी भरलेल्या येवला जि. अहमदनगर येथील अस्पृष्यांच्या परिषदेतील भाषणात हे ठणकावून सांगीतलं "मी हिन्दू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिन्दू म्हणून मरणार नाही". त्या दरम्यान आणि नंतरही देशा-परदेशातील सर्व धर्मांचा सखोल आभ्सास करुन परखड चिकित्सा करणारी पुस्तकं लिहिली. देशातली हिन्दू मानसिकता बदलते की नाही याची तब्बल २० वर्षे वाट पाहिली आणि अखेर येवले परिषदेत जाहिर केल्यानुसार १९५६ ला मोठ्या जनसमुदायासह नागपूर मक्कामी बाबासाहेबांनी बौद्ध धम्माचा स्विकार करुन हिन्दू धर्मातील रुढी परंपरा आणि कुचंबनेपासून एका मोठ्या मानवी समुदायाची दैन्य आणि दास्यातून मुक्तता केली. हा क्रांतीकारी पाऊल उचलत असताना 'बुद्ध आणि त्याचा धम्म' हा आचरण ग्रंथ द्यायला बाबासाहेब विसरले नाहीत, हे अजून विषेश.

सनातनी हिन्दूंनी बाबासाहेबांचं ऐकलं असतं आणि हिंदू धर्मातल्या वाईट चाली, रीती, रुढी, परंपरा काढून टाकून बाबासाहेबांनी सुचवलेला सर्ववसावेशक, सर्वजनहिताय हिन्दू धर्म स्विकारला असता तर आज परिस्थिती वेगळी असती.

**(लेखक मराठी भाषेचे साहित्यिक आणि इंग्रजी भाषा आणि साहित्याचे संशोधन मार्गदर्शक) आहेत**

# प्रत्येक कर्माला नीतीचा आधार ठेवला पाहिजे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**दैनंदिन जीवनात आपला कोणालाही शारीरीक मानसिक त्रास होणार नाही याची काळजी दक्षता घेतली गेली पाहिजे. कसही वागल तरी काहीच होत नाही हा फक्त गैरसमज असतो . तात्काळ हिशोब होत नाही पण योग्य वेळी नियती कोणालाही सोडत नाही. म्हणून आपलं कर्म विचार पुर्वक असलच पाहिजे. आयुष्य हे क्षणभंगुर आहे तर आत्मा अमर असुन शरीर नश्वर आहे. तरी सुद्धा आपण आपल्या चालत्या काळात अंधाधुंद वागतो पण जेव्हा नियती आपला हिशोब करते तेव्हा आपण बल असुन देखील निर्बल ठरतो. आयुष्यात निर्बल ठरायच नसेल तर निती धर्मा नुसार कर्म केल पाहिजे.**

आधुनिक केसरी

आपल कर्म अनितीच असेल तर मग मात्र आपण कितीही बलवान धनवान असलो तरी एक वेळ नियती आपला हिशोब करतेच. हे आपण मान्य केले अथवा नाही केले तरी ते वास्तव आहे. आपली ताकद क्षमता, सत्ता संपत्ती, अधिकार पद याचा वापर निती धर्मा नुसारच केला पाहिजे. शक्ति, सत्ता, संपत्ती,पद बळ याचा अंहकार बाळगु नये. अंहकार दुष्कर्म करण्यासाठी प्रवृत्त करतो. सत्कर्म करा सत्य निष्ठा आचरण केले तर वाईट वेळ येऊन सुद्धा वाईट होत नाही. नियती आपल्या मागे उभा राहते. सदैव नियती आपल्या मागे खंबीरपणे उभा राहील असंच कर्म केल पाहिजे. कर्म चुकलं तर मग मात्र नियती योग्य वेळी सोडत नाही. कर्म सुधारलं तर जीवन सावरत कर्म बिघडलं तर भविष्य उध्वस्त झालं म्हणून समजा हा निसर्गाचा अलिखित नियम आहे. धर्माच्या चौकटीत कर्म असेल तर नियती बरकत देते. धर्माच्या चौकटी मोडून कर्म केल तर योग्यवेळी नियती सोडत नाही. मग फक्त पश्चात्ताप शिल्लक उरतो. म्हणून आपलं कर्म सुधारता आलं पाहिजे कर्म सुधारलं तर जीवन आपोआप सुधारतं शक्ति सामर्थ्य ताकदी पेक्षा नियती वर जास्त विश्वास आणि विसंबून असलं पाहिजे. नियती समोर सामर्थ्य निरपयोगी ठरत. कोण शक्तिमान कोण बालवान हे महत्वाचं नसुन फक्त नितीमान टिकतो हे वास्तव आहे. क्षणिक आनंद हा आसुरी वृत्ती च लक्षण असतं. क्षणिक आनंद मिळण्यासाठी आपल्या बळाचा दुरुपयोग करण उचित नाही. आणि केलाच तर नियती योग्य वेळी सोडत नाही. आपल कर्म धर्माच्या चौकटीत असलं पाहिजे. निसर्ग प्रत्येक घटनेच बारीक चित्रीकरण करत असतो. योग्य वेळ आली कि निसर्गाने केलेला हिशोब भल्या भल्याच गणित बिघडवतो. आपली नियती हिच आपला बचाव करू शकते. वाईट कर्म केल्यावर काही होत नाही असं आपल्याला काही कालावधी साठी वाटु शकतं तस वाटण स्वाभाविक आहे. कारण नियती तात्काळ नाही तर योग्यवेळी हिशोब करते. कर्म करताना कोणीही साक्षीदार नसला तरी सुद्धा निसर्ग हा साक्षीदार असतोच. माणसं माफ करतीलही पण नियती कधीच कोणाला माफ करत नाही. जे पेरल ते उगवतच म्हणून शक्तिमान होण्या ऐवजी नितिमान व्हा नक्कीच कामी येईल. दैनंदिन जीवनात कर्म करत असताना विचार पुर्वक विवेक पुर्ण कर्म केल पाहिजे. आपल्याकडं किती ही बळ असलं शक्ती असली ताकद असली सर्व सृष्टी वरील शक्ति आपल्या बाजूने उभा राहिल्या व नियती फिरली तर आपल्या सोबतची कोणतीही शक्ति कामी येत नाही. अगदी बलाढ्य शक्ति सुद्धा नियती समोर निष्प्रभ ठरते. म्हणून आयुष्यात प्रत्येक कर्म करताना आपल्याला कोणी पाहिलं नाही तरी निसर्ग सगळं काही पाहत असतो. आपल्या शक्तिला वेळ प्रसंगी लोक घाबरु शकतात पण निसर्ग कोणालाही घाबरत नसतो. नियती योग्य वेळी भल्या भल्याचा हिशोब करते.

# संगीतरत्न दीनानाथ मंगेशकर

आधुनिक केसरी

**गणेश भट्ट नवाथे यांच्यापोटी एक संगीतरत्न जन्मले ते म्हणजे दीनानाथ मंगेशकर. गोव्यातील मंगेशी येथे २९ डिसेंबर १९०० रोजी त्यांचा जन्म झाला. २४ एप्रिल १९४२ रोजी त्यांचे पुणे येथे निधन झाले. त्यांना ही भावपूर्ण आदरांजली. मराठी रंगभूमीला लाभलेले वरदान म्हणजे दीनानाथ गणेश मंगेशकर. त्यांनी वयाच्या आठव्या वर्षी घरातून पलायन केले. त्यांचा खडा आवाज आणि तालज्ञान यामुळे त्यांनी नावलौकिक मिळविला. रणदुंदुभि नाटकातील त्यांची पदे त्याची साक्ष देतात.**

जन्मान कऱ्हाडे ब्राह्मण असलेल्या दीनानाथांचे वडील मंगेशी येथील मंगेशाच्या मंदिरात पुजारी होते. त्यांचे मूळ आडनाव हर्डिकर होते परंतु त्यांचे पूर्वज मंगेशीच्या मंदिरात अभिषेक करीत. म्हणून ते अभिषेकी झाले. प्रख्यात संगीतकार जितेंद्र अभिषेकी यांचे वडील दीनानाथ मंगेशकरांचे सावत्र भाऊ होते. मात्र दीनानाथांनी हे आडनाव स्वीकारलेच नाही. त्यांची आई येसूबाई राणे. गोव्यात त्याकाळी देवदासीची रीत अस्तित्वात होते. असे म्हणतात की येसूबाईंच्या पोटी त्यांचा जन्म झाला.

दीनानाथांनी वयाच्या पाचव्या वर्षापासून संगीताचे शिक्षण बाबा माशेलकर यांच्याकडे घेतले.

ग्वालियर संगीत विद्यालयात त्यांनी संगीत व गायनाचे धडे घेतले. ज्ञानाचार्य रामकृष्णबुवा वझे यांच्याकडे त्यांनी रीतसर शिक्षण घेतसे. त्यांच्या गायकीवर फिदा झालेल्या दीनानाथांनी त्यांचा गंडा बांधला. त्यांनी तारुण्यातच बिकानेरचा दौरा केला. किराणा घराण्यातील पं. सुखदेव प्रसाद, पं. मणिप्रसादाचे वडिल यांच्याकडे संगीताचे धडे गिरवले. वयाच्या अकराव्या वर्षी ते किर्लोस्कर संगीत नाटक मंडळीत दाखल झाला. नंतर वैचारिक मतभेदामुळे त्यांनी किर्लोस्कर नाटक मंडळी सोडली. चिंतामणराव कोल्हटकर व कृष्णराव कोल्हापुरे यांच्या साथीने बलवंत नाटक कंपनी सुरू केली. त्यांना राम गणेश गडकरी यांचा आशीर्वाद होता. परंतु ही नवी नाटक कंपनी सुरू केल्यानंतर काही काळाने म्हणजे १९१९ मध्ये गडकरी यांचे निधन झाल्याने कंपनी विस्कळित झाली. त्याकाळचे विख्यात संगीत नट बालगंधर्व म्हणजेच नारायणराव राजहंस त्यांच्यावर फिदा होते. आपल्या



कंपनीत दीनानाथांचा प्रवेश झाला तर त्यांचे स्वागत पायघड्या घालून व एक रुपया त्यांच्या पायाखाली ठेवू अशी घोषणा केली. दीनानाथ त्यांच्या कंपनीत दाखल झाले. १९३५ मध्ये त्यांनी तीन चित्रपट निर्माण केले. त्यांनी निर्माण केलेली कृष्णार्जुन युद्ध ही अजरामर कलाकृती. परंतु या चित्रपटांच्या नादाने त्यांची अधोगतीच झाली. कृष्णार्जुन युद्ध मराठी आणि हिंदी दोन्ही भाषात तयार झालेला चित्रपट. त्यात त्यांनी भूमिका केली होती. एक गाणे देखील गायले होते. दीनानाथांनी मराठी संगीत रंगभूमीला सोन्याचे दिवस मिळवून दिले. दीनानाथ यांची कन्या लता मंगेशकर खरोखरच भारत रत्न होत्या. आशा भोसले, हृदनाथ, उषा मंगेशकर मीना मंगेशकर (खडीकर) ही त्यांची अपत्ये. आपापल्या क्षेत्रात सर्वांनी नावलौकिक मिळविला आहे.

प्रकाश रामचंद्र क्षीरसागर
संपर्क ९०११०८२२९९

आर्थिक तंगीला कंटाळून दीनानाथ अखेरच्या काही दिवसांत बेसुमार मद्यपान करू लागले, १९३० मध्ये त्यांना हे व्यसन जडले. त्यांनी धैर्याने मृत्यूचा सामना केला. अखेर २४ एप्रिल १९४२ रोजी या गानसम्राटाने अखेरचा श्वास घेतला.

**दीनानाथ मंगेशकर अभिनित नाटके**

**मानापमान (कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर द्वारा लिखित ) रणदुंदुभी (वीर वामनराव जोशी द्वारा लिखित द्वारा रचित, संगीत रामकृष्ण वझे बुवा ) पुण्यप्रभाव संन्यस्त खड्ग (विनायक दामोदर सावरकर द्वारा रचित संगीत रामकृष्ण वझे बुवा) राजसंन्यास ( राम गणेश गडकरी द्वारा लिखित ) देशकंटक रामराज्य वियोग**

# तंत्र शिक्षणाचे व्यापारीकरण...



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने,AICTE ने, पुनः दरवाजे म्हणजे फ्लड गेट्स उघडले आहेत.मध्यंतरी नवे कोर्सेस, नव्या तुकड्या मंजुरीला मान्यता देण्याचे थांबले होते. करोना काळात तसेही सर्वच शिक्षणाचे गाडे थांबले होते.आता गेल्या दोन वर्षांत गाडी रुळावर येताच व्यवसायिक शिक्षणाचा धंदा करणारी माणसे कामाला लागलेली दिसतात!गेल्या अनेक वर्षांपासून प्रत्येक राज्यात इंजिनियरिंग च्या अनेक म्हणजे चक्क हजारो जागा रिकाम्या राहतात.अनेक विभाग,अनेक कॉलेजेस बंद पडली.जे पदवी धर बाहेर येतात त्यांना नोकऱ्या मिळत नाहीत.**

आधुनिक केसरी

किंबहुना हे विद्यार्थी आजच्या आय टी, किंवा इतर उद्योगासाठी उपयोगाचे नाहीत अशी कंपन्यांची तक्रार आहे.मग अशा परिस्थितीत AICTE हा उद्योग कशासाठी करते ?या मागची पार्श्वभूमी समजून घेणे गरजेचे आहे. अनेक दशकापूर्वी जेव्हा संगणक, आय टी क्षेत्रात नवे वारे सुरू झाले तेव्हा प्रत्येक कॉलेजात कॉम्प्युटर,आय टी उद्योगासाठी गरज म्हणून असेच कोर्सेस वेगवेगळ्या नावाने सुरू झालेत.त्या काळी वेगळे कॉम्पुटर विभाग नव्हतेच.अगदी आय आय टी त देखील इलेक्ट्रिकल विभागच असे.. अजूनही खरगपूर सोडले तर इतर जुन्या आय आय टी त इलेक्ट्रॉनिक विषयाचा वेगळा विभाग नाही. पण काळा ची गरज ओळखून असे नवे विभाग सुरू झालेत. इंजिनियरिंग चे शिक्षण खाजगी संस्था च्या,राजकारणी पुढाऱ्यांच्या, हातात गेल्या पासून चित्रच पालटले. नव्या नव्या नावाने स्पेशल कोर्सेस, विभाग सुरू झाले. म्हणजे इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, संगणक, आय टी,टेली कम्युनिकेशन असे कोणतेही दोन शब्द वापरून नवे विभाग सुरू झालेत.त्यात नवे कोर्सेस सुरू करताना, काळाची गरज ओळखून अभ्यासक्रम तयार करणे, त्याला पूरक नव्या प्रयोगशाळा उभारणे अशा आवश्यक गोष्टींना प्राधान्य न देता फक्त जागा वाढविणे, क्यापिटेशन फी, मॅनेजमेंट कोटा या नावाखाली लाखो करोडोची कमाई करणे यालाच प्राधान्य होते.आता तीन चार दशकांत देखील या बाबतीत फारसा फरक पडलेला नाही. आता वाटेकरी वाढले आहेत एव्हढेच!

नवे कोर्सेस सुरू करायचे तर त्या विषयातील तज्ञ,अनुभवी प्राध्यापक हवेत. उदाहरण द्यायचे तर सध्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग असे अत्याधुनिक कोर्सेस चक्क स्वतंत्र विभाग म्हणून सुरू झालेत.पण या विषयाचे सखोल ज्ञान असलेली, या विषयात काम,संशोधन केलेली तज्ञ प्राध्यापक मंडळी कुठे आहेत. कुणीही स्वतःला आय टी, एआय,एम एल अशा विषयात तज्ञ म्हणून मिरवू शकत नाही.मग मुळात सगळे जुनेच विषय,जुनेच अभ्यासक्रम शिकवायचे ,अन् फोडणी दिल्या सारखे नवे काही,कसेतरी शिकवायचे असा प्रकार सुरू आहे.नवे सॉफ्ट वेअर् नाही,नव्या आधुनिक प्रयोग शाळा नाहीत,आधुनिक टेक्स्ट बुक



चा वापर नाही, प्रोजेक्ट,सेमिनार च्या दिव्याखाली तर पूर्ण अंधार अशी दयनीय अवस्था आहे. तरी यापैकी अनेक कॉलेजेस ला एन बी ए ची,न्याक ची मान्यता,ग्रेड मिळते हे आश्चर्यच! अर्थात आता हे आश्चर्य करण्याचेही कारण नाही. कारण या ग्रेड्स मागचा फोलपणा नुकताच उघडकीस आला आहे.तोही बाहेरून नव्हे,संस्थेच्या आतूनच!

आता पुन्हा नवे कोर्सेस,नव्या तुकड्यांना मान्यता,जागा वाढ हा घाट कशा करता घातला जातोय ?एकीकडे नव्या उद्योगांना पूरक,कौशल्य असलेले कसे किती इंजिनिअर्स हवे आहेत, त्यांना कोणत्या विषयाचे थिअरी,प्रॅक्टिकल चे ज्ञान द्यायला हवे,त्यासाठी तज्ञ प्राध्यापक आणायचे कुठून याचा सखोल अभ्यास कुणी केलाय का ? केला असेल तर त्या अभ्यासाचे, अहवालाचे निष्कर्ष काय आहेत हे आधी बाहेर यायला हवे. एरवी आपण कोवळ्या तरुण विद्यार्थ्यांची, पालकाची चक्क फसवणूक करतो आहोत असेच सिध्द होईल. अजूनही सिव्हील, मेकॅनिकल अशा जुन्या विषयाचे महत्व कमी झाले असे नाही. शिवाय इंजिनियरिंग, त्यासाठी आय टी, ए आय म्हणजेच भविष्य अन् बाकीचे विषय कमी दर्जाचे, कमी गरजेचे असेही नाही.उलट आता आंतर शाखीय विषयाची गरज आहे. एका विषयात स्पेशलायझेशन चे दिवस गेलेत.सर्वच विषयाचे थोडे थोडे ज्ञान आवश्यक आहे.किंबहुना नव्या पिढीला सोशल सायन्स,मॅनेजमेंट,पर्यावरण, अर्थ शास्त्र,नैतिकता ,समाजाचे मानस शास्त्र, एकत्र टीम मध्ये काम करण्याचे, संवाद साधण्याचे कौशल्य हे सारे गरजेचे आहे.उलट जास्त गरजेचे आहे. आय टी ची बुं आली धावा आय टी कडे,आता ए आय,एम एल ची हवा आहे का घ्या हे विषय असा हास्यास्पद मूर्खपणा फक्त आपल्याकडेच चालू शकतो. परदेशात विद्यापीठे काही बदल करायचे तर पुढील दोन तीन दशकांच्या गरजा चा अभ्यास करतात. आपल्या देशातील गरजा चा विचार करतात. हातचे सोडून पळत्याच्या मागे धावण्याची वृत्ती घातक असते. त्यातून विद्यार्थ्यांचे, पुढच्या पिढीचे भले होत नाही. फक्त काही निवडक व्यवसायिक संस्थाचालक,राजकारणी पुढारी, भ्रष्ट अधिकारी( परवानग्या देणारे ), याचेच उखळ पांढरे होते! खाजगी कॉलेजेस ना प्राध्यापक निवडीचे स्वातंत्र्य तरी असते,पण सरकारी कॉलेजेस, विद्यापीठाचे इंजिनियरिंग कॉलेज येथे वर्षानुवर्षेप्राध्यापकाच्या नव्या नेमणुका झाल्याच नाहीत. होत नाहीत. त्यांना कंत्राटी, भाड्याच्या शिक्षकाच्या भरवशावर कसेतरीगाडे हाकावे लागते! म्हणजेनाव मोठे दर्शन खोटे असासारा कारभार.

खाजगी करणामुळे शिक्षणाचा बट्ट्याबोळ झालाय. सुरुवात कॉन्व्हेन्ट, इंटर न्याशनल वगैरे प्राथमिक शाळे पासून होते. मग प्रवेश परीक्षेच्या तयारी साठी ट्युशन इंडस्ट्री आली. मग लाखोंची वार्षिक फी घेणारी खाजगी इंजिनियरिंग कॉलेजेस..खाजगी प्रायमरी शाळा अन् इंजिनियरिंग कॉलेजची फी सारखी असणे हा केव्हढा मोठा विनोद!! कशावरच सरकारचे नियंत्रण नाही.असेल तर फायलितल्याकागदोपत्री. कारण पुढाऱ्यांच्या च शाळाआहेत. कॉलेजेस आहेत. स्वतःच स्वतःवरनियंत्रण कसे लादून घ्यायचे ? त्यामुळे तेरी भी चूप मेरी भी चूप!

आता तर नवे शैक्षणिक धोरण येऊ घातले आहे. ते जास्त डीमांडिंगआहे. चॅलेंजिंग आहे.तिथेही संस्था चालकाची,विद्यापीठाची, धरसोड वृत्तीच दिसून येते. संभ्रम आहे. गोंधळ आहे. नव्या आव्हाना साठी नव्या दमाची,नवा विचार स्वीकारणारीतज्ञ मंडळी लागतील. अभ्यासक्रम डिझाईन करणे,नवे विषय नव्या पद्धतीने शिकवणे, नवी परीक्षा पद्धत स्वीकारणे,नवे कौशल्य आत्मसात करणे, नव्या आधुनिक प्रयोग शाळा उभारणे यासाठी उत्साहाने भारलेली, कष्ट करण्याची तयारी असणारी,टीचींग हे प्याषन म्हणून स्वीकारणारी शिक्षकाची पिढी हवी आहे. त्यासाठी नव्या नेमणुका कराव्या लागतील.जे आहेत त्यांना ट्रेनिंग द्यावे लागेल.नवा आधुनिक विचार रुजवावा लागेल सर्व शिक्षण संस्थातून,विद्यापीठातून. एआयसीटीने नव्या प्रवेशाचे, नव्या कोर्सेसची,जागा वाढीचे फ्लड गेट्स उघडण्या आधी हा सगळा विचार गांभीर्याने करणे जास्त गरजेचे आहे.



# पाणलोट क्षेत्र विकासासाठी क्षमतावृद्धी प्रशिक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आगाखान एजन्सी फॉर हबीटेब इंडियाच्या वतीने जयपूर, भांबरडा, पिंपळखुटा, फेरण जळगावमधील सुमारे 225 शेतकरी पाणलोट क्षेत्र विकास, जळजीवन मिशन, शेततळे, पर्यावरण, जलसुरक्षा, वृक्षारोपण, दुष्काळाबाबत गावकरी एकदिवसीय प्रशिक्षणयासाठी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी फिल्ड ऑफिसर आकाश घुले, प्रोग्राम मॅनेजर राजकुमार तोगरे, प्रेरणा देशमुख, धोंडीराम पडुल, दिव्यांशु राज आदींनी परिश्रम घेतले.

# पुस्तकांच्या वाचनाने निर्माण होतात आनंदाचे स्रोत : डॉ. जगदीश पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** पुस्तकांमध्ये उत्कृष्ट लेखकांचे अनुभव आणि विचार असतात. पुस्तके वाचल्याने आपले व्यक्तिमत्त्व विकसित होते. वाचनामुळे भाषेची कौशल्ये आणि शब्दसंग्रह विकसित होते. पुस्तके वाचणे हा तणाव कमी करण्याचा देखील एक मार्ग आहे. पुस्तके वाचल्याने आपल्या मनाला बौद्धिक आहार मिळतो. वाचनामुळे आपली मानसिक कार्यक्षमता वाढते. त्यामुळे पुस्तकांचे वाचन खरोखरच आनंदाचे स्रोत असल्याचे प्रतिपादन बालभारतीच्या मराठी भाषा अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. जगदीश पाटील यांनी येथे केले. भुसावळ येथील सार्वजनिक वाचनालयात पुस्तक दिनानिमित्त आयोजित ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्‌घाटनाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी ग्रंथपाल नितीन तोडकर, सहाय्यक ग्रंथपाल अवधूत दामोदरे, सेवक होनाजी चौधरी, अजय पाटील, श्री. अत्तरदे यांच्यासह वाचकांची उपस्थिती होती. प्रारंभी सरस्वती मातेच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात येऊन दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविकात ग्रंथपाल नितीन तोडकर म्हणाले की, सार्वजनिक वाचनालयाने गेल्या 153 वर्षात भुसावळसह परिसरातील वाचकांना ज्ञानाचे एक दालन उपलब्ध करून दिले आहे. तंत्रज्ञानाच्या युगात वाचन कमी होत असले तरी सार्वजनिक वाचनालयाच्या माध्यमातून वाचन संस्कृती विकसित करण्यासाठी नवनवीन उपक्रम घेतले जात असतात. या उपक्रमांना वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळत असल्याचेही श्री. तोडकर यांनी सांगितले. सहाय्यक ग्रंथपाल अवधूत दामोदरे म्हणाले की, पुस्तकदिनाचे औचित्य साधून व सार्वजनिक वाचनालयाला 153 वर्ष पूर्ण झाल्याबद्दल वाचनालयातील विविध विषयांवर आधारित असलेल्या 153 पुस्तकांचे तीन दिवस प्रदर्शन भरवण्यात आले आहे. सर्व वयोगटातील लोकांना पुस्तके आनंद प्रदान करतात. त्यामुळे सार्वजनिक वाचनालयात मुलांसाठी, वृद्धांसाठी, स्त्रीयांसाठी, सर्वच क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी पुस्तके आहेत.




# क्रांतिसूर्य महात्मा बसवेश्वर हे कर्ते सुधारक

## प्रा. बाळासाहेब बोराडे : श्रीक्षेत्र राजूर येथे महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** भोकरदन तालुक्यातील श्रीक्षेत्र राजुर येथे क्रांतीसुर्य महात्मा बसवेश्वर महाराजांची 892 वी जयंती मोठ्या उत्साह साजरी करण्यात आली. महात्मा बसेश्वर उत्सव समितीच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा बसवेश्वर जयंतीच्या निमित्ताने विविध समाजभिमुख उपक्रम व शालेय विद्यार्थ्यांसाठी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात शिवशक्ती आश्रम तुपेवाडी येथील देवाबाबा यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी मंचावर शिवाजीराव पुंगळे, अरविंद थोटे, ज्ञानेश्वर पुंगळे जगनराव पवार, गणेशराव साबळे, जगनराव थोटे, आप्पासाहेब साखरे, पंढरीनाथ करपे, श्रीरामपंच पुंगळे, प्रा. बाळासाहेब बोराडे, भीमाशंकर आप्पा दारुवाले, कैलास आप्पा गबाळे, पद्माकर चंदनशिवे, नवनाथ फुके, राजू पंडित, दीपक घुगे, जगन वाघमारे, साहेबराव पवार, विलासराव थोटे, बबनराव मगरे, कारभारी टेपले, भगवान ठोंबरे, गजाननअग्रवाल, हरिभाऊ चव्हाण, संतोष पुंगळे, मिलिंद मगरे, हरिदास निकम, पिंपळे सर, सतीश तवले आदी मान्यवर उपस्थित होते. महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त जगनराव पवार, पंढरीनाथ करपे, पद्माकर चंदनशिवे, कैलासआप्पा गबाळे, जगन्नाथराव थोटे आदी मान्यवरांनी भाषणातून महात्मा बसवेश्वरांच्याजीवनावर प्रकाश टाकला. महात्मा बसेश्वर जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमात सर्व जाती धर्माच्या लोकांनी उत्स्फूर्तपणे स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. यावेळी शालेय विद्यार्थ्यांसाठी रांगोळी व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्या तसेच सहभागी स्पर्धकांना स्मृतीचिन्ह सन्मानपत्र व रोख वकीशी देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त घेण्यात आलेल्या वकृत्व स्पर्धेतील विजेत्या व सहभागी स्पर्धकांना स्मृतिचिन्हे, प्रशस्तीपत्र आणि रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. त्यामध्ये वेदांत जटाळे, संस्कृती तवले, गौरी दारूवाले, श्रावणी दारूवाले ,समृद्धी तवले, अथर्व हिंगमिरे ,आरती हिंगमिरे,वर्षा दारूवाले, रांगोळी स्पर्धेत गौरी दारुवाले , कल्याणी दारूवाले, श्रावणी लोखंडे, राजनंदिनी मोरे, खुशी हिंगमिरे, सई निकम, पुनम जटाळे, पल्लवी शेटे,पल्लवी दारूवाले, संध्या तायडे,वैष्णवी राठोड, ईश्वरी गवळी आदी स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यावेळी परीक्षक म्हणून जगन वाघमोडे, विष्णू गवळी, आर. एच. दानवे, सदाशिव दारूवाले,देशमुख सर यांनी काम पाहिले. यावेळी महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. कार्यक्रमाच्या शेवटी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उत्सव समितीचे उपाध्यक्ष विनायक कोमटे,संदीप मगरे, सचिव नागेश चिंचोलकर, सहसचिव मयूर हाजबे ,योगेश जितकर,कोषाध्यक्ष पांडुरंग इंगळे ,समितीचे सर्व सदस्य यासह अनेकांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास वीरशैव लिंगायत समाज बांधव तसेच शिवा संघटनेचे पदाधिकारी,कार्यकर्ते व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक भीमाशंकर आप्पा दारुवाले, सूत्रसंचालन कैलास अप्पा गबाळे व ॲड.संदिप अप्पा दारूवाले यांनी केले शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणाचा समारोप करताना प्रा .बाळासाहेब बोराडे म्हणाले की तरुणांनी महापुरुषांना डोक्यावर न घेता त्यांचे विचार डोक्यात घेतले पाहिजे .महात्मा बसवेश्वरांनी जातीभेद आणि वर्णव्यवस्था यासारख्या अनिष्ट प्रथाविरुद्ध बंड पुकारून प्रहार केला .महिलांना समानतेची वागणूक दिली . आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन दिले . अनुभव मंडप संस्थेच्या माध्यमातून जगातील पहिली लोकशाही संसद सुरू केली .त्यामध्ये सर्व समाजघटकांना सामील करून घेतले .म्हणून महात्मा बसवेश्वर हे बोलके नव्हे तर कर्ते समाज सुधारक होते असे मत उत्सव समितीचे अध्यक्ष प्रा . बाळासाहेब बोराडे यांनी व्यक्त केले .

# सेवानिवृत्तीच्या एक दिवस आधीच काळाचा घाला

## वलखेड फाटा येथे तिहेरी अपघातात एक ठार; प्राध्यापकवर्गावर दुःखाचा डोंगर

आधुनिक केसरी न्यूज

**दिंडोरी :** तालुक्यातील वलखेड फाटा येथे अल्टो कार, पिकअप गाडी व मोटरसायकल तिहेरी अपघात होऊन पिकअप मधील प्रा. रामदास माधव शिंदे, रवळस, ता. निफाड यांचा जागीच मृत्यू झाला. वलखेड फाटा येथे सोमवार दि.24 रोजी सकाळी 8 : 30 वा. नाशिक येथून वणी येथे जाणारी अल्टो कार ( एमएच 15 सीएम 4474 ) यातील प्रा. रामदास माधव शिंदे वणी येथील ज्युनियर कॉलेज येथे कार्यरत होते ते नाशिक येथून वनी येथे आपल्या अल्टो गाडीने जात असताना वणीहून दिंडोरीकडे जाणारी पिकअप वाहन ( एमएच 15 ईजी 5830 ) सागर भास्कर पेलमहाले ( अवनखेड ) यांची जोराची धडक होऊन पाठीमागून येणारी मोटरसायकल स्प्लेंडर प्रो ( एमएच 15 डीएच 4931 ) विठ्ठल पंढरीनाथ पागे ( आंबेवणी ) हे त्यात धडकले असा तिहेरी अपघात झाला अपघातात प्राध्यापक रामदास शिंदे हे जागीच ठार झाले त्यांचा उद्या मंगळवार दि.25 रोजी वणी येथे रिटायरमेंटचा कार्यक्रम होता. त्यात त्यांच्यावर असा काळाने घाला घातला. त्यामुळे सर्व शिक्षक वर्गात मोठी हळहळ व्यक्त करण्यात आली. मोटरसायकल वरील विठ्ठल पागे हे अपघातात जखमी झाले आहे. वलखेड फाटा येथे टाकण्यात आलेले स्पीड बेकर हे ( फायबर ) निकृष्ट टाकल्यामुळे ते लवकर खराब होऊन उघडले गेले. येथील स्पीड बेकर हे चांगल्या प्रकारचे टाकण्यात यावे व थोडे दिंडोरी बाजूला पाठीमागे घेण्यात यावे कारण ते लवकर जवळ गेल्याशिवाय दिसत नाही. त्यामुळे येथे त्वरित चांगल्या प्रतीचे स्पीड ब्रेकर टाकावे अशी मागणी वलखेड येथील ग्रामस्थ व वाहनधारकांकडून करण्यात येत आहे. सदर अपघाताबाबत पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार टी. बी. जाधव, पोलीस नाईक एस. के. कडाळे अधिक तपास करत आहे.



सध्या वलखेड फाट्यावर गर्दी मोठ्या प्रमाणावर होत असल्याने याठिकाणी दिशादर्शक यंत्रणा, अथवा झेब्रा पट्टा निशाण अथवा रेडियम पट्टे, आदी बसविण्याची मागणी वारंवार होत असल्याने याकडे गंभीर बाबीकडे कानाडोळा का ? असा सवाल सध्या निर्माण होत आहे . अपघात होण्याला कारणीभूत फक्त याठिकाणांच्या अपुऱ्या सुविधा . तेव्हा संबंधित खात्याने याकडे त्वरित लक्ष घालून येथे या सुविधा निर्माण करून द्याव्या .
....रघुनाथ पाटील ( वलखेड ता .दिंडोरी )

# धोकादायक ॲसिडची खुलेआम विक्री

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** या आधुनिक युगात नवीन जलद गतीचे तंत्रज्ञान निर्माण होत आहे. परंतु त्याच तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनाला धोका ही वाढत असतो. एखाद्याने नवीन घर बांधले की त्या घराच्या सुशोभीकरणासाठी काचेचे प्रमाण जास्त वाढत आहे मग घरातील आरसा असो खिडकी असो किंवा जीना आणि गॅलरी असो त्यात मोठ्या प्रमाणात काच बसवला जातो. परंतु त्यात साधारण काच नसतो त्या काचेवर ॲसिड द्वारे कलाकृती केली जाते. परंतु या ॲसिड चा काचेवर कलाकृती कामासाठी कुठलाही परवाना नसताना खुलेआम ग्लास शॉप वर त्याचा वापर केला जातो याकडे कुणाचेच लक्ष नाही कित्येक वर्षापासून होत असलेल्या ॲसिड चा वापर स्थानिक कामगारांना धोकेदायक तर आहेच. परंतु याचा गैरवापर होण्याचीही शक्यता असते. धुळे शहरात काही वर्षांपूर्वी झालेल्या दंगलीत ॲसिड चा वापर झाला कदाचित ते ॲसिड येथूनच



आले, असावे असे प्रश्न निर्माण होतात. येणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारे वातावरण निर्माण होऊ नये म्हणून त्यामुळे त्या आधीच यावर आळा घालने खूप महत्त्वाचे दिसून येत आहे. सध्या धुळे शहरात आय.पी.एस ऋषिकेश रेड्डी यांनी धुळे शहराच्या अवैध धंद्यांना टाळे लावण्याचे ठरवले आहे त्यांच्यासारखे कारवाही करणारे अधिकारी खूप कमी असतात त्यामुळे त्यांच्यावर विश्वास आहे की ते लवकरच या ॲसिडच्या काळाबाजाराकडे लक्ष देतील व मानवी शरीराला धोकेदायक असलेल्या ॲसिड वर आळा घालतील.



# शाळेची श्रीमंती शिक्षकाच्या कर्तृत्वावर असते : भुसारे

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** ज्ञानी शिक्षकच आदर्श विद्यार्थी घडवू शकतात. लाभाची अपेक्षा न ठेवता निस्वार्थीपणे सेवा करणाऱ्या शिक्षकांच्या कर्तुत्वावरच शाळेची श्रीमंती अवलंबून असते. त्यासाठी शिक्षकांनी सर्वस्व झोपून ज्ञानदान करावे असे मत प्राथमिक शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे यांनी व्यक्त केले.

बालक मंदिर शाळेच्या नामांतराच्या कार्यक्रमा प्रसंगी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष जिंतूर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ब्रिजगोपालजी तोष्णीवाल, तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. आ. गुलाबचंद राठी, ज्येष्ठ विधीज्ञ अशोक सोनी, सुंदरलाल सावजी अर्बन बँकेचे चेअरमन माजी मुकुंद सावजी कळमकर, शोभादेवी राठी, अजय शर्मा, ज्येष्ठ विधीज्ञ मनोज सारडा, माजी नगराध्यक्ष प्रताप देशमुख, सचिन गोरे, उपनगराध्यक्ष बाळासाहेब भांबळे, ज्येष्ठ शिक्षण विस्ताराधिकारी गजानन वाघमारे ,माजी नगरसेवक डॉ पंडित दराडे, संदीपभाई शर्मा, माजी उपनगराध्यक्ष बाळासाहेब भांबळे उपस्थित होते. स्व. डॉ. सुभाषचंद्र राठी यांनी जिंतूर शिक्षण संस्थेची मुहूर्त मेढ रोऊन संस्थेचा कारभार यशस्वीपणे हाताळला. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून शाळेस डॉ. सुभाषचंद्र राठी बालक मंदिर शालेचे नामकरण करण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी भुसारे म्हणाली की, ग्रामीण व शहरी भागात शिक्षण क्षेत्रात बाहेरच्या लोकांचा अनावश्यक हस्तक्षेप वाढला आहे. त्यामुळे शिक्षकांना म्हणावी तशी काम करण्याची संधी मिळत नाही. संस्थाचालकांनी निस्वार्थीपणे संस्था चालवण्याचे व्रत घेतले पाहिजे. यावेळी ॲड.अशोक सोनी यांनी डॉ. राठी यांच्या कार्याचा गुणगौरव केला. नीतिमान आचरण ठेवल्यास माणूस कर्तृत्व सिद्ध होत असतो. स्वतःसाठी धडपडत राहिल्यापेक्षा समाजाच्या उन्नतीसाठी धडपडणाराच खरा कर्तृत्व असतो. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष ब्रिजगोपाल तोष्णीवाल म्हणाले की, बालक मंदिर शाळेची जबाबदारी सांभाळत असताना संस्थेला यशाच्या शिखरावर ठेवण्यासाठी प्रयत्न करणार असून त्यात शिक्षकांची व पालकांची भूमिका सुद्धा तेवढीच महत्त्वाची आहे. येणाऱ्या तीन वर्षात शाळा डिजिटल करून पहिली ते बारावी पर्यंतचे



वर्ग सुरू करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. यावेळी शोभादेवी राठी,विनय राठी,प्रणव राठी, प्रतापराव देशमुख, बाळासाहेब भांबळे, डॉ. पंडित दराडे, यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी जिंतूर शहरातील व्यापारी, कर्मचारी, पत्रकार मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद पाचपीले तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक गजानन तीखे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे सचिव रमण तोष्णीवाल यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकाश खोलगडे, शिवाजी काकडे, संजय साबळे, सुभाष चोपडे, ज्ञानदेव कुदळे, गणेश रुघें, ज्ञानबा तडस, वसंत राठोड ,मोहन दराडे, प्रदीप राठोड, प्रसाद घुगे, गजानन आभुरे, सुभाष धानोरकर ,अनिता मनोरवार, संध्या पटोदे, विजया पतंगे, बसवश्री स्वामी, प्रियंका मोरे, पूजा प्रधान, रामप्रसाद राखे, महेंद्र मांडवगडे, विठ्ठल चाफे आदींनी प्रयत्न केले. यावेळी संस्थेच्या दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



# स्त्रियांना समानतेचा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी संघर्ष केला

## डॉ. प्रल्हाद लुलेकर यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** स्त्रियांना समानतेचा दर्जा प्राप्तकरून देण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी सतत संघर्ष केला असे प्रतिपादन डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले व महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंतीनिमित्त शनिवार दि. 22 एप्रिल रोजी लहुजी साळवे कर्मचारी महासंघाच्या वतीने आयोजित व्याख्यान प्रसंगी केले. तसेच या कार्यक्रमासाठी दुसऱ्या वक्ते म्हणून बालाजी थोटवे लासाकम राज्य प्रदेशाध्यक्ष यांनी मातंग समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी आरक्षणाची नितांत गरज आहे. परंतु राजकीय इच्छाशक्ती नसणाऱ्या सरकारने समाजाच्या सर्वच प्रश्नांकडे डोळेझाक करत आहे, असे ते म्हणाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मधुसूदन कांडलीकर हे होते तर उद्घाटक म्हणून स.सो. खंडाळकर होते. कार्यक्रमचे प्रास्ताविक लसाकम जिल्हा अध्यक्ष लक्ष्मण जांभळीकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साईनाथ भालेराव केले तर पी. यु. आरसूड यांनी आभार मानले. यावेळी व्यंकट भोसले, विजय कांबळे, मारुती कलवले, नवनाथ रोकडे, राम कांबळे, माणिक गालफाडे, ऍड.सुभाष नाडे ऍड.दयानंद भांगे संजय भोसले,गणेश तुपे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. मारुती गायकवाड, बापूसाहेब उपाडे, आशुतोष रसाळ,अजय तुपे, अतुल खंडगावकर, अनिल पवार यांनी परिश्रम घेतले.

# मराठी पाऊल पडते पुढे' 5 मे ला प्रदर्शित होणार; निर्माते प्रकाश बाविस्कर यांची पत्रकार परिषदेत माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिवलाईन इन्कम ग्रोथ प्रा. लि. प्रस्तुत 'मराठी पाऊल पडते पुढे' हा मराठी चित्रपट 5 मे रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होईल अशी माहिती चित्रपटाचे निर्माते प्रकाश बाविस्कर यांनी धुळ्यात शाहूमहाराज नाट्यमंदीरात झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी चित्रपटातील नायक चिराग पाटील, नायिका सिध्दी पाटणे, प्रविण माळी यांच्यासह सहकलाकार तसेच खान्देश अहिराणी कस्तुरी संघाच्या अध्यक्षा विजया मानमोडे उपस्थित होत्या. चित्रपटाविषयी माहिती देताना निर्माता प्रकाश बाविस्कर म्हणाले की, चित्रपटाची कथा लेखक, दिग्दर्शक स्वप्निल मयेकर यांची आहे. अकात फिल्म्सचे चंद्रकांत विसपुते हे सहनिर्माते आहेत. संगीत दिग्दर्शक समीर खोले यांनी चित्रपटातील गाणी संगीतबध्द केली आहेत. चित्रपटात अभिनेते अनंत जोग, सतीश पुळेकर, सतीश सलागरे, संजय क्षेमकल्याणी, प्रदीप कोथमिरे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. चित्रपटात नायकाचा मराठी बिझनेसमॅन होण्यासाठीचा संघर्ष पाहायला मिळेल. मनोरंजनाबरोबरच मराठी तरुणांच्या स्वप्नांना बळ देणारा आणि भविष्याप्रती जागरुक करणारा हा चित्रपट मराठी माणसाने नक्कीच पाहावा असे आवाहन बाविस्कर यांनी केले आहे. चित्रपटाच्या माध्यमातून येणार्या निव्वळ नफ्यातील दहा टक्के रक्कम कलाकारांना आणि उर्वरित भाग हा मराठी तरुणांना व्यवसाय मार्गदर्शनासाठी, आत्महत्याग्रस्त शेतकर्यांच्या मुलांसाठी आणि वृध्दाश्रमासाठी देवू केला आहे. त्याचबरोबर चित्रपटाचे लकी ड्रॉ तिकीट मिळविण्यासाठी 8955441133 या क्रमांकावर प्रेक्षकांनी मिसकॉल द्यावा असे आवाहनही बाविस्कर यांनी केले.





# महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** महान क्रांतिकारी समाज सुधारक महात्मा बसवेश्वर याना लिंगायत समाजाच्या मठात त्यांच्या जयंती निमित शनिवार(ता,२२) रोजी जेस्ठ नागरीक रविंद्र आप्पा साखरे यांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले, प्रमुख उपस्थितीत समाज कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत होते,बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वर यानीअभुतपूर्व समतवादी चळवळ उभी करुन तत्कालीन समाजाला विधायक दिशा दाखविली होती. धोंडीराम राजपूत यांच्या हस्ते आ.रमेश पा. बोरनारे यानी दिलेल्या निधीतून बांधण्यात येणारया मंगल कार्यालयाचा भूमिपूजन समारंभ ही पार पडला शिव-लिंग आप्पा साखरे यानी भूमिपूजन जागेचे विधिवत पूजन केले. से.नि. अभियंता सुदाम आप्पा गोंधले यानी यात पुढाकार घेतला. या समयी विनोद फसके, महेश फसके, सोमनाथ साखरे, दीपक साखरे,अविनाश साबरे, मनोज पाटणी ,राजू शेटे, नंदू शेटे, विजय मिटकरी, कैलास साखरे, सुदाम आप्पा, सी.के.वालेकर यांची उपस्थिती होती. रविंद्र आप्पा साखरे यांनी मठाच्या विस्तारीत कामासाठी एक्कावन हजार रुपये देणगी जाहिर केली.

RAHUL S. ANCHALKAR
9850500629, 9325727798
R.R. Enterprises
घर तुमचे... इंटरीयर आमचे !
आपल्या घरातील आतील संपूर्ण सजावट आम्ही करू, वेल डेकोर फर्नीचर, किचन ट्रॉलीज, सोफा, बेड सर्वकाही तुमच्या स्वप्नाप्रमाणे
Add. : N-8, Behind Onkar Gas, CIDCO, Aurangabad-431 003
E-mail : anchalkarrahul@gmail.com
Web:rrenterprises.com

# विविध धर्मांचे सण, उत्सव झाल्यावर झेंडे पताका काढून घ्यावे

## सपोनि भरत मोरे यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा व फरदापुर



परिसरातील गांवामधील लागलेले विविध धर्माचे पोस्टर, झेंडे, पताका व वाढदिवसांचे, राजकिय, सामाजिक पोस्टर,सण, उत्सव झाल्यावर तात्काळ काढून घ्यावे अशे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत मोरे फर्दापूर यांनी केले आहे फर्दापुर पोलीस स्टेशन च्या वतीने फर्दापूर,सावळदबारा,नादांतांडा,डाभा,देव्हा री, टिटवी आम्ही दि.24/4/23 रोजी परिसरातील गांवाची पाहणी केली असता फर्दापुर सोबत वरील गावामध्ये मोठया प्रमाणामध्ये विविध धर्माचे लहान मोठे झेंडे लावण्यात आलेले आहे तसेच विविध जयंतीचे, वाढदिवसांचे, राजकिय, सामाजिक पोस्टर पण मोठया प्रमाणात लावण्यात आलेले आहे त्यामुळे फर्दापुर व हद्दीतील गांवाचे विद्रूपीकरण झालेले असुन आपण ग्रामंपचायत फर्दापूर व त्याचप्रमाणे इतर गावातील ग्रामपंचायत येथील कर्मचारी मार्फत जयंतीचे, वाढदिवसांचे, राजकिय, सामाजिक पोस्टर, विविध धर्माचे झेंडे, पताका हया दिनांक 01/05/2023 रोजी पुर्वी काढण्यात यांवे वरील वस्तु संदर्भात एखादा वाद निर्माण झाल्यास किंवा फर्दापूर पोलीस स्टेशन ला गुन्हा दाखल झाल्यास यांची सर्वस्वी जबाबदारी ही ग्रामपंचायत व सरपंच यांची राहिल व आपल्याबरोबर संबंधीतावर पण योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. तसेच दिनांक 01/05/2023 च्या आत वरील नियमांचे काटेकोर पालन करावे पालन न झाल्यास पोस्टर मधील सर्व लोकांवर शहर विद्रुपीकरण अंतर्गत फर्दापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येईल यांची ग्रामपंचायतने नोंद घ्यावी तसेच सदर बाबतची नोटीस ही गांवामध्ये लावण्यात यावी तसेच लोकांना दंवडी पिटऊन कळविण्यात यावे. सदरचे पत्र व बातमी गुन्हा दाखल करताना पुरावा म्हणुन वापरण्यात येईल करीता परिसरातील ग्रामपंचायतने दखल घ्यावी अशे आवाहन सपोनि भरत मोरे फर्दापूर यांनी केले आहे.

# सोयगाव तालुक्यातील देव्हारी येथे संत सेवालाल महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा

## अखंड हरिनाम सप्ताह, १०८ रामायण पाठ व परिसरात मिरवणूक

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** सोयगाव तालुक्यातील देव्हारी येथील श्रीराम लक्ष्मण जानकी और श्री संत सेवालाल महाराज मूर्ती प्राण प्रतिष्ठा हनुमान कळस स्थापित अखंड हरिनाम सप्ताह और १०८ रामायण पाठ दि.२६/४/२३ ते ५/५/२३ असा दहा दिवस चालणाऱ्या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. प. पु. श्री.संत नारायण स्वामी बापू यांच्या आशीर्वादाने ग्राम संसद देव्हारी श्री राम, लक्ष्मण, जानकी आणि संत सेवालाल महाराज यांची मुर्ती व अखंड हरिनाम सप्ताह १०८ रामायण पाठ आणि महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे.

मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा आयोजक उत्तम महारु चव्हाण तंटामुक्ती अध्यक्ष,अनिल हरलाल वडते, राजवतीदेवी शिवचरणसिंह ठाकूर,विमलबाई आत्माराम चव्हाण नादांतांडा, आत्माराम मोरसिंग चव्हाण नांदातांडा व समस्त गावकरी मंडळी यांच्या वतीने दि.२६ एप्रिल ते ०५ मे २०३३ शुक्रवारी दुपारी दोन ते पाच पर्यंत महाप्रसादाचा कार्यक्रम होईल दि.२७/४/२३ ला भव्य शोभायात्रा केंद्रीय राज्यमंत्री ना रावसाहेब दानवे पाटील व ना गिरीशजी महाजन ग्रामविकासमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत सावळदबारा, टिटवी, डाभा,नादांतांडा व देव्हारी येथे निघणार आहे.

सदरील कार्यक्रमास धर्मगुरू बाबूसिंग महाराज पोहरादेवी, श्याम चैतन्य महाराज गुरुदेव सेवा आश्रम जामनेर, महंत परमहंस स्वामी रामभारतजी महाराज चांगेफळ,ह.भ.प.संदीप महाराज माऊली ऋषीगड आश्रम महाल्बदा, ह.भ.प. योगेश महाराज मृदुंगाचार्य, गणेश महाराज मगर गायनाचार्य, रिकेश महाराज सातारकर गायनाचार्य यांच्या उपस्थितीत डॉ रमेश केशव चव्हाण, डॉ सुदाम चव्हाण, महेशसिंह ठाकूर, श्रीमती राजवती देवी ठाकूर, नरेंद्रसिंह ठाकूर, धनराज प्रताप चव्हाण, उत्तम महारु चव्हाण तंटामुक्ती अध्यक्ष, विठ्ठल हरलाल चव्हाण, देविदास मांगो राठोड, चुनीलाल सेवा चव्हाण, नेपाल ठाकूर, सुंदरबाई इंदल राठोड, प्रशराम पवार, थानसिंग नथ्थू राठोड, बिरेंद्र ठाकूर, प्रेमसिंग राठोड, संजय त्र्यंबक चव्हाण, ईश्वर महारु चव्हाण यांचे या कार्यक्रमास अनमोल सहकार्य राहणार आहे. २७ एप्रिल संत सेवालाल महाराज यांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कळशा रोहण सोहळा संपन्न होणार आहे. तरी सोयगाव तालुक्यातील तांड्या, वस्त्या, देऊळगाव गुजरी, फत्तेपूर, जामनेर व सावळदबारा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी दहा दिवस चालणाऱ्या कार्यक्रमाची शोभा वाढवावी आणि या गोड अमृतवाणी सोहळ्याचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त रामभक्त मंडळ देव्हारी ता सोयगाव जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजक उत्तम महारु चव्हाण यांनी केले आहे.

# हॉटेल, टपरी चालकांना वंचिततर्फे डस्टबिन वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** चिंचोली लिंबाजी हे गाव तालुका लेवलचे गाव असताना चिंचोली लिंबाजी गावात सगळ्या सुख सुविधा उपलब्ध आहे. एक प्रसिद्ध बाजार पेट आहे. आजुबाजुला तीस चाळीस खेडेपाडे लागुन असताना सगळे टकाटक असताना पण बसस्टँडवरील मुतारीजवळ फेकल्या जाणाऱ्या केर कचरा मुळे पुर्ण गावाची चव जात आहे. ग्रामपंचायत तर्फे बर्याच वेळेस त्या ठिकाणी साफ सफाई करण्यात आली. पण जशीना तशीच घाण त्या ठिकाणी साचत आहे. ती घाण बसस्टँड वरील पान टपरी व बसस्टँड परीसरात राहणारी लोक ती घाण मुतारी जवळ येऊन फेकतात. ही बाब वंचित कार्यकर्ते यांच्या लक्षात आली असता वंचित तर्फे हॉटेल व पान टपरी चालकांना डस्टबिन वाटप करण्यात आले. या वंचित कार्यकर्ते बसस्टँड वरील सर्व दुकानदारांना विनंती करण्यात आली.. की कोणीही मुतारी जवळ केर कचरा आणुन फेकु नये. या वेळी वंचित




कार्यकर्ते तातेराव भुजंग, बाळु वाघ, मनोज बावस्कर, अमृत चौघुले यांच्या तर्फे डजबिन वाटप करण्यात आले...यावेळी उपस्थित, जेठे मामा, अशोक शेख, नदीम शेख सर, हरीशेठ वाढेकर व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.




गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर